




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३५ ■ गुरूवार, दि. ५ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


## टर्निंग पॉईंटवरुन नव्या इनिंगची सुरूवात करणार

### नवनीत राणांचा सुचक इशारा....



प्रतिनिधी ५ मार्च

**अमरावती:** माजी खासदार नवनीत राणा यांना भाजपच्या स्टार प्रचारक होत्या. त्यांना केवळ जिल्ह्यातच नाही तर राष्ट्रीय स्तरावरही ओळखले जाते. यावेळी भाजपकडून राज्यसभेची उमेदवारी मिळण्याची आशा होती. तथापि, भाजपने त्यांना उमेदवारांच्या यादीतून वगळले आहे, ज्यामुळे नवनीत राणा आणि त्यांच्या समर्थकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. विधानसभा निवडणुकीत पराभव होऊनही भाजपने ज्याप्रमाणे डॉ. अनिल बोंडे यांना राज्यसभेत पाठवले, त्याचप्रमाणे नवनीत राणा यांनाही राज्यसभेत पाठवायला हवे होते, असे त्यांच्या समर्थकांचे मत आहे.

नवनीत राणा यांनी पुन्हा एकदा सोशल मीडियावर एक हृदयस्पर्शी पोस्ट प्रसिद्ध करून संयम दाखवला आहे. त्यात त्या म्हणतात, 'संघर्ष माझ्यासाठी काही नवीन नाही; मी कोणत्याही कोनातून नव्याने सुरुवात करू शकते.' निराशा आहे. यापूर्वी, सरकार स्थापनेच्या वेळी, भाजप समर्थकांना खात्री होती की सलग चौथ्यांदा आमदारकी जिंकणारे रवी राणा यांना मंत्रिपद मिळेल, परंतु भाजपने त्यांना तेव्हाही निराश केले.

नवनीत राणा भाजपसाठी समर्पितपणे काम करतात. विधानसभा निवडणुकीत भाजपसाठी त्यांनी केलेल्या कठोर परिश्रमाचे परिणाम सर्वांना स्पष्ट आहेत.अमरावतीमध्ये भाजपचे पाच आमदार आहेत. त्यावेळी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा सामना केला, अगदी हनुमान चालीसा पठणाला विरोध करण्यापर्यंत मजल मारली. अलिकडेच, त्यांनी आंध्र प्रदेशात भाजपसाठी स्टार प्रचारक म्हणून प्रचार केला.नगरपालिका निवडणुकीतही त्यांनी भाजपसाठी काम केले. तथापि, या काळात त्यांच्यावर काही ठिकाणी भाजपविरोधी कारवायांचा आरोप झाला.२०१९ मध्ये अपक्ष म्हणून लोकसभेवर धडक मारणाऱ्या नवनीत राणा यांनी २०२४पूर्वी कमळ हाती घेतले.

# राज्यसभा निवडणुकीसाठी हालचालींना वेग



प्रतिनिधी ५ मार्च

**मुंबई** :राज्यसभेच्या निवडणुकीसाठी राजकीय हालचालींना वेग आला असून भाजपकडून उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर गुरुवारी विधानभवनात सर्व उमेदवारांनी हजेरी लावली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह विनोद तावडे आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले उपस्थित होते. या भेटीमुळे राज्यसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण अधिक तापल्याचे पाहायला मिळाले.

भाजपने उमेदवारांची घोषणा केल्यानंतर पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह उमेदवारांनी विधानभवनात जाऊन पुढील प्रक्रियेबाबत चर्चा केली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रणनीती आखण्याबरोबरच पक्षांतर्गत समन्वय साधण्यावरही भर देण्यात आला. राज्यातील राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.दरम्यान, उपमुख्यमंत्री दिवंगत नेते अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार देखील राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती पुढे आली आहे. पार्थ पवार यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले असून याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दुसरीकडे, महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे अध्यक्ष शरद पवार हेही राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे राज्यसभेच्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट राजकीय चुरस निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.राज्यसभेच्या जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने पुढील काही दिवस राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विविध पक्षांकडून रणनीती आखली जात असून निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## कोण आहे ज्योती वाघमारे



शिवसेनेकडून रोहित टिळक, ज्योती वाघमारे अर्ज दाखल करणार आहेत. सोलापूरच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एक अभ्यासू, आक्रमक व्यक्तिमत्व म्हणून डॉ. ज्योती वाघमारे यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कष्टकरी कुटुंबातून येऊन उच्चशिक्षणाच्या जोरावर समाजकारणात ठसा उमटवणाऱ्या डॉ. वाघमारे सध्या शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाच्या मुख्य प्रवक्त्या म्हणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्या आहेत. डॉ. ज्योती वाघमारे यांचे वडील नागनाथ वाघमारे हे दलित पँथरचे सक्रिय कार्यकर्ते होते. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांनी हॉटेलमध्ये वेटर आणि बांधकाम मजूर म्हणूनही काम केले. मात्र, त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत सोलापूरच्या जनतेने त्यांना नगरसेवक म्हणून निवडून दिले. वडिलांचा हाच सामाजिक वारसा ज्योती वाघमारे यांनी पुढे चालवला. दहावीच्या परीक्षेत ८४ टक्के गुण मिळवणाऱ्या डॉ. वाघमारे यांनी १२ वीमध्ये पुणे विभागातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला होता. इंग्रजी साहित्यात पीएचडी प्राप्त केलेल्या डॉ. वाघमारे यांना महिलांच्या प्रश्नांवरील संशोधनासाठी राज्यस्तरीय प्रथम पुरस्कारही मिळाला आहे. त्यांचं मराठी, हिंदी, इंग्रजी, तेलगू आणि कन्नड अशा पाच भाषांवर प्रभुत्व आहे. अधिव्याख्याता म्हणून १० वर्षांहून अधिक काळ कामाचा अनुभव असलेल्या डॉ. वाघमारे यांनी आपल्या कार्याची सुरुवात मानवी हक्क अभियान, विद्रोही सांस्कृतिक चळवळ आणि आंबेडकरी चळवळीतून केली. काही काळ त्यांनी वृत्त निवेदिका म्हणूनही काम पाहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांचे विचार जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात व्याख्याने दिली आहेत.

## ८७ मृत्यूमुखी, ३२ जणांचा जीव वाचला

वृत्तसंस्था ५ मार्च

**नवी दिल्ली :** अमेरिकेने श्रीलंकेजवळ भारतातून परतणाऱ्या इराणी युद्धनौके आयआरआयएस देनावर हल्ला करून ते बुडाले आहे. श्रीलंकेच्या सरकारने दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यात आतापर्यंत ८७ इराणी खलाशी ठार झाले आहेत. अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी सांगितले की, एका अमेरिकन पाणबुडीने हिंदी महासागरात इराणी जहाजाला टॉर्पेडोने धडक दिली आणि बुडाले. श्रीलंकेच्या नौदलाने ३२ जखमी खलाशांना वाचवले आणि त्यांना रुग्णालयात दाखल केले. जहाजावर सुमारे १८० खलाशी होते. बेपत्ता लोकांना शोधण्यासाठी शोध आणि बचाव मोहीम सुरू आहे.

## अजितदादांच्या विमान अपघाताभोवती संशयाचं धुकं

प्रतिनिधी ५ मार्च

**पुणे** : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेबाबत गेल्या काही दिवसांमध्ये सुरु असलेल्या आरोप-प्रत्यारोपांमुळे प्रचंड संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. रोहित पवार यांनी अनेक पत्रकार परिषदा घेऊन अजित पवार यांच्या मृत्यूबाबत व्हीएसआर कंपनी आणि नागरी उड्डाण संचलनालय (डीजीसीए) काहीतरी माहिती दडवत असल्याचा आरोप केला होता. अजित पवार गटातील अनेक आमदारांनीही रोहित पवारांच्या या भूमिकेची पाठराखण केली आहे.



त्यामुळे या प्रकरणाच्या चौकशीसाठीचा राज्य सरकारवरील दबाव वाढला होता. या पार्श्वभूमीवर अजित पवारांच्या अपघाताचा तपास असलेल्या सीआयडीने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या प्रकरणाचा तपास करत असलेल्या सीआयडी पथकाने आता व्हीएसआर कंपनीचा मालक आर.के. सिंग याला चौकशीसाठी बोलावले होते. त्यानुसार आर.के. सिंग गुरुवारी पुण्यातील सीआयडी कार्यालयात चौकशीसाठी पोहोचले आहेत. या चौकशीत सीआयडीच्या अधिकाऱ्यांकडून आर.के. सिंग यांना रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांच्या अनुषंगाने प्रश्न विचारले जाण्याची शक्यता आहे. त्यावर आर.के. सिंग काय स्पष्टीकरण काय देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.अजित पवार यांचा विमान अपघातामध्ये मृत्यू झाल्यानंतर आर.के. सिंह यांनी आपल्या कंपनीच्या विमानात कोणताही तांत्रिक बिघाड असल्याचा दावा फेटाळून लावला होता.

## ठाणे-मुलुंडच्या सीमेवर वाहतूकदारांचा ठिय्या!

प्रतिनिधी ५ मार्च

**ठाणे :** वडळा-घाटकोपर-कासारवडवली (मेट्रो चार) मार्गिकेच्या पादचारी पुलाच्या निर्माण कामामुळे घोडबंदर, ठाणे भागात वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र बुधवारी रात्री दिसून आले, त्यापाठोपाठ गुरुवारी सकाळी ई-चलान विरोधात आक्रमक झालेल्या वाहतूकदारांनी आपली वाहने मुंबईच्या आझाद मैदानाच्या दिशेने नेण्यास सुरुवात केली. मात्र, आझाद मैदान येथे वाहने नेण्याऐवजी ठाणे-मुलुंडच्या वेशीवरील आनंदनगर नाक्यावर त्यांनी ठिय्या मांडला. यामुळे ठाण्यात मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गांवर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. या कोंडीचा फटका नागरिकांना बसला.

## मेळघाटातील शैक्षणिक अंधारावर माजी मंत्री बच्चू कडू यांचा ओरखडा

### इयत्ता पहिली ते पाचवीचे वर्ग भरतात एकाच खोलीत

प्रतिनिधी ५ मार्च



**अमरावती:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे पण मेळघाटातील शाळांची स्थिती पाहता विषमता दिसते. मेळघाटातील विद्यार्थी कुठल्या अवस्थेत शिक्षण घेत आहेत या गंभीर विषयाच्या मर्मावर माजी मंत्री बच्चू कडू यांनी बोट ठेवले आहे. मेळघाटच्या आंदोलना दरम्यान मेळघाटातील शाळांची पाहणी केली असता विदारक चित्र त्यांना दिसले.

चिमुकल्या विद्यार्थ्यांचा क्लास घेतला. एका वर्ग खोलीत चाळीसवर विद्यार्थी कसे शिक्षण घेत असतील ही बाब त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली.

मेळघाटातील गावात सोयी सुविधा नसल्याने शिक्षक गावात राहत नाहीत. त्यांच्या सवडीनुसार ते येतात. याचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. बच्चू कडू यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत वास्तव जाणून घेतले. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याच्या दृष्टीने सुधारणा करण्याशिवाय गत्यंतर नाही. हे चित्र बदलण्यासाठी संघर्ष करावा लागेल. तसेच क्रांती शिवाय यामध्ये सुधारणा होणार नाही. एकीकडे तरण तणावापासून सुविधा असलेल्या शाळा आणि दुसरीकडे एकाच खोलीत भरणारे वर्ग ही विषमता दूर होणे आवश्यक आहे असे बच्चू कडू म्हणाले.

## गॅस एजन्सी संचालकांना कोण वाचवत आहे प्रश्न कायम

### घरगुती गॅस तर फक्त संबंधित ग्राहकाला मिळतो मग कसे

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोला:** २८ फेब्रुवारी जिल्हाधिकाऱ्यांच्या विशेष आदेशान्वये जिल्हा पुरवठा विभागाने अकोला शहरातून हॉटेल व्यवसायिकांकडून तब्बल अडीचशे च्या वर घरगुती गॅस सिलिंडर जप्त केले होते. परंतु या बाबत कारणीभूत असणाऱ्या घरगुती गॅस सिलेंडरच्या एजन्सींना कारणे दाखवा नोटीस का बजावली नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. गॅस एजन्सी संचालकांना कोण वाचवित आहे असा प्रश्न कायम आहे.

घरगुती गॅस मिळण्यासाठी ओटीपी द्यावा लागतो. हा ओटीपी मिळविण्यासाठी गृहिणींना मोठे कष्ट करावे लागतात. पण, थेट व्यावसायिकांना घरगुती गॅस कसा सहज उपलब्ध होतो हा प्रश्न कायम असताना अडीचशे सिलेंडर जप्तीनंतर गॅस एजन्सी संचालकांवर कारवाई का टाळली जात आहे. पुरवठा विभाग संबंधितांना का वाचवित आहे अशी विचारणा होत आहे. अकोला शहरासह जिल्यात घरगुती गॅस सिलेंडर चा वापर खाजगी हॉटेल, चहा टपरी तसेच इतर ठिकाणी सर्रास पणे होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या होत्या. या वर निर्बंध घालण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी यांनी आदेश पारित करीत अकोला शहरासह जिल्ह्यातील घरगुती गॅस सिलेंडर चा वापर जे हॉटेल व्यवसाय करत असतील त्यांच्या कारवाई करण्याची निर्देश दिले होते. शहरातील विविध भागातून घरगुती गॅस सिलेंडरचा वापर करणाऱ्या हॉटेल व्यवसायिकांकडून अडीचशे च्या वर घरगुती गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले होते.अकोला जिल्ह्यात एकूण ३४ विविध कंपनीचे गॅस सिलेंडर विकणाऱ्या एजन्सी असून त्यापैकी अंदाजे २० एजन्सी या अकोला शहरातील आहे. एकीकडे सर्वसामान्य नागरिकांना घरगुती गॅस सिलेंडर साठी मोठी प्रतीक्षा करावी लागते, तर एकाच वेळी कारवाईमध्ये तब्बल अडीचशे सिलेंडर हे अवैधरित्या वापर करताना पकडण्यात आल्यावर अद्याप पुरवठा विभागाने संबंधित गॅस एजन्सी धारकांना शोकॉज नोटीस का दिली नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. या बाबीकडे जिल्हाधिकारी तसेच पुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.




CLASSIFIED

**प्लॉट प्लॉट प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606 7757905649

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट

पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8468872250 8788432278


## अफवांवर मुळीच विश्वास ठेवू नका

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोला:** अमेरिका इराणमध्ये युद्ध सुरू आहे. या काळात अकोला जिल्ह्यासह विभागात पेट्रोल डिझेलचा पुरवठा करणाऱ्या गायगाव डेपो मध्ये मोठ्या प्रमाणात पेट्रोल आणि डिझेलचा साठा उपलब्ध असून जिल्ह्यात कुठेही कमतरता भासणार नाही, अशी माहिती अकोला जिल्हा पेट्रोल डिझेल असोसिएशनच्या तर्फे देण्यात आली आहे. याचबरोबर पेट्रोल डिझेल बाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन सुद्धा करण्यात आले आहे.

अमेरिका व इराणच्या युद्धा दरम्यान याचा थेट परिणाम भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. परंतु या युद्धजन्य परिस्थितीमुळे अकोला जिल्ह्यात पेट्रोल डिझेल बाबत कोणताही तुटवडा भासणार नाही याबाबतची माहिती आज अकोला जिल्हा पेट्रोल डिझेल असोसिएशन च्या तर्फे देण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यात सह विभागात पेट्रोल डिझेलचा पुरवठा करणाऱ्या गायगाव येथील पेट्रोल डेपोमध्ये मुबलक प्रमाणात पेट्रोल डिझेलचा साठा उपलब्ध आहे.

त्यामुळे अकोला शहरासह जिल्ह्यातील नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता लागेल तेवढाच इंधनाचा साठा आपल्या वाहनात साठवून ठेवावा तसेच कोणत्याही अफवांना बळी पडू नये असे आवाहन अकोला जिल्हा पेट्रोल डिझेल असोसिएशनचे अध्यक्ष राहुल राठी यांनी आर आर सी न्यूज शी बोलताना दिली.

## फोर व्हिलर चोरट्यांची हाय प्रोफाईल चोरी

### अलार्म सिस्टिम करतात हॅक फोर व्हिलर करतात लंपास.....

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोला:** अकोल्यात फोर व्हिलर चोरट्यांनी अक्षरशः हैदोस घातला आहे. चक्क तंत्रज्ञानाचा वापर करत पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. सिंधी कॅम्प परिसरातून एका लॅपटॉपच्या मदतीने अवघ्या काही मिनिटांत आलिशान कार लंपास केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. एक नाही तर या चोरट्यांनी एक क्रेटा आणि दूसरी हॅरिअर चोरी केली.

चोरट्यांनी प्रथम उभ्या असलेल्या कारची काच फोडली. त्यानंतर लॅपटॉपचा वापर करून गाडीची अलार्म सिस्टिम हॅक केली. त्यामुळे कार चोरी करताना वाजणारे



सायरन, बझर वाजले नाही. त्यानंतर काही क्षणांतच गाडी सुरू करून चोरटे पसार झाले. सिंधी कॅम्प परिसरात नितीन नेभानी, गोवर्धन आखरे यांच्या दोघांच्या फोर व्हिलर एकाच दिवशी चोरट्यांनी रात्रीतून लंपास केल्या. चोरीची हा संपूर्ण घटना क्रम परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्याद्वारे पोलीस आता चोरट्यांचा शोध घेत आहेत. तपासात असे समोर आले आहे की, या गुन्ह्यासाठी वापरलेली चोरट्यांची स्वतःची गाडी देखील एका शोरूममधून चोरलेली होती. अकोल्यातील वाढत्या वाहन चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. खदान पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. हाय प्रोफाईल फोर व्हिलर चोरट्यांना अकोला पोलिस केव्हा अद्दल घडविते याकडे कारमालकांचे लक्ष लागले आहे.

## शेतकरी कर्जमाफीचा निर्णय ३० जूनपर्यंत जाहीर करणार!

प्रतिनिधी ५ मार्च

**मुंबई** : शेतकरी कर्जमाफीबाबत प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अहवाल अपेक्षित आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार हे ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफीबाबत निर्णय जाहीर करतील, असे विधान कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत केले.

कलम २६० अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना कृषिमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. चर्चेत सत्तारूढ व विरोधी पक्षातील अनेक सदस्यांनी सहभाग घेतला होता. राज्यातील शेती अधिक सक्षम, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी महाराष्ट्राने २०२५ ते २०२९ या कालावधीसाठी स्वतंत्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर केले असून असे धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यात हवामानातील अनिश्चितता, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव, उत्पादन खर्चातील वाढ व बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेती अधिक जोखमीची झाली आहे. या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन उपाय म्हणून 'माय ॲग्री' एआय धोरण आखण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
गुरुवार, दि. ५ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## ग्रामीण भागात कलम ३७(१) व (३) लागू

प्रतिनिधी ५ मार्च

**अमरावती:** जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)व(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. ११ मार्च २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कळविले आहे.

# गुन्हे शाखा अमरावती शहर यांच्याकडुन चोरीच्या दुचाकीसह विधीसंघर्षीत बालक ताब्यात !

प्रतिनिधी ५ मार्च

**अमरावती :** चोरीच्या दुचाकीसह विधी संघर्षित बालक पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आयुक्तालय हददीतील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकिस आणणेबाबत आदेशीत केल्यावरुन गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात पथकातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे




पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अप.क्रं. ९८/२०२६ कलम ३०५ (ब) भा. न्या.सं. अन्वये दुचाकी चोरी चा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा संमातर तपास गुन्हे शाखेचे पथक करीत असतांना आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहीती मिळाली की एक इसम हा सुतगिरणी परीसरात चोरीची गाडी घेवुन उभा आहे. यावरुन नमुद ठिकाणी जाउन विसंबा यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातील सदर पल्सर मोटरसायकलबाबत विश्वासात घेउन बारकाइने विचारपुस केल केली असता त्याने ती पल्सर मोटारसायकल दि.२१.०२.२०२६ रोजी रात्री अंदाजे १०.३० वा दरम्यान प्रशांतनगर चौकातील हनुमान मंदीराचे पाठीमागे असलेल्या पानठेल्यासमोरुन चोरुन नेली होती असे त्याने सांगीतले वरुन त्याचे ताब्यातुन बजाज कंपनीची पल्सर मोटरसायकल जप्त करून पोलीस स्टेशन फेजरपुरा अप. क्रं. ९८/२०२६ कलम ३०५(ब)भा.न्या.सं. प्रमाणे दाखल असलेला मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघडकिस आणला व पुढील कायदेशीर कार्यवाही करीता विसंबा यास पोस्टे फेजरपुरा यांच्या ताब्यात देण्यात आले.विधीसंघर्षीत बालक याचेकडुन ताब्यात घेतलेला मुद्देमाल एक लाल काळया रंगाची एन एस २०० पल्सर, बजाज कंपनीची विना नंबर ची पल्सर मोटारसायकल २०० सी सी ची जिचा चेसीस नं MD2A36FX2PCH38830, इंजिन न ब्र्हैइउ९८४४० असा आहे असा एकुण १,४०,००० रु मुददेमाल जप्त करण्यात आला. सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, सपोआ गुन्हे शाखा शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार पोहेकॉ दिपक सुंदरकर, सुनिल लासुरकर, जहीर शेख, सचीन बहाळे,, नापोका अतुल संभे, पोकॉ सुरज चव्हाण, राजिक रायलीवाले, योगेश पवार, चालक प्रभात पोकळे यांनी केली आहे.

## राज्याच्या नवीन कौशल्य धोरण मसुद्यावर हरकती व सूचनांचे आवाहन; ६ मार्चपर्यंत मुदत

प्रतिनिधी ५ मार्च

**अमरावती :** महाराष्ट्र शासनामार्फत राज्याचे नवीन कौशल्य विषयक धोरण तयार करण्याची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली असून, या धोरणाचा सुधारित प्रारूप मसुदा नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे. कौशल्य विकासाला नवी दिशा देणाऱ्या या महत्त्वाकांक्षी धोरणाबाबत जिल्ह्यातील सर्व प्रशिक्षण संस्था, उद्योजक, महाविद्यालये आणि उमेदवारांनी आपल्या महत्त्वपूर्ण सूचना व अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे करण्यात आले आहे. शासनाने गठीत केलेल्या विशेष समितीने 'M/s KPMG Advisory Services' यांच्या तांत्रिक सहकार्याने हा व्यापक मसुदा तयार केला आहे. कौशल्य परिसंस्थेमधील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी हा मसुदा 'महास्वयंम' पोर्टलवर (www.mahaswayam.gov.in) नोटीस विभागामध्ये सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या धोरणामुळे भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि कौशल्य प्रशिक्षणात सकारात्मक बदल अपेक्षित आहेत. जिल्ह्यातील सर्व भागधारकांनी या मसुद्याचे सखोल अवलोकन करून आपल्या सूचना, सुधारणा किंवा हरकती दिनांक ६ मार्च २०२६ पर्यंत लेखी स्वरूपात mhskillpolicy@msads.in या ई-मेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे. राज्याचे कौशल्य धोरण अधिक लोकाभिमुख आणि प्रभावी करण्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी आणि संबंधित संस्थांनी या प्रक्रियेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

## अंबादेवी, एकविरादेवी परिसराच्या विकासाला गती द्यावी -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी ५ मार्च

**अमरावती:** शहरातील महत्वाचे असलेले अंबादेवी आणि एकविरादेवी संस्थानचा विकास करणे आवश्यक आहे. यासाठी दोन्ही संस्थानच्या विकासासाठी एकत्रित आराखडा राबवावा लागणार आहे. यासाठी सर्व जमिनीवरील नियोजन करून एकत्रित स्वरूपात कामांचे नियोजन करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्री रूख्मिणी विदर्भपीठ कौंडण्यपूर आणि अंबादेवी, एकविरादेवी संस्थानच्या विकास आराखड्याबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्यासह संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी, अंबादेवी आणि एकविरादेवी ही शहराच्या मध्यवस्तीत असून जुन्या वस्तीमध्ये आहेत. भाविक मोठ्या प्रमाणावर येत असल्याने याठिकाणी सुविधा उभारणे आवश्यक आहे. प्रामुख्याने मंदिराजवळ असलेले अरूंद रस्ते मोठे करणे गरजेचे आहे. तसेच भाविकांसाठी वाहनतळाची सुविधा उभारावी लागणार आहे. या मंदिरांमध्ये नवरात्री उत्सवाच्या कालावधीत गर्दी होते. गर्दीच्या वेळी सुविधा वाढविणे गरजेचे असते, यावर विश्वस्त मंडळाने लक्ष देणे गरजेचे आहे. विकास आराखडा राबविताना टप्पेनिहाय राबवावा. यासोबतच विकासकामे करताना बांधकाम क्षेत्र वाढविण्याची शक्यता असल्यास महिला बचतगटांना विविध मालाच्या उत्पादनासाठी इमारत देण्यात यावी. कौंडण्यपूर येथे तिर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ विकासासाठी निधी देण्यात आला आहे. यातून संरक्षण भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. संस्थानकडून कौशल्य विकास, तसेच इतर उपक्रम राबविण्यात येत आहे. यातून गरजूंना रोजगार उपलब्ध होणार आहे. यासाठी इमारत बांधकाम आणि इतर सोयी सुविधांसाठी निधीसाठी पाठपुरावा करण्यात येईल. त्यानुषंगाने आवश्यक जमिन हस्तांतरणासाठी संस्थानने पुढाकार घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले.

## चाकूने दहशत पसरणारा आरोपी अटकेत...!




प्रतिनिधी ५ मार्च

**अमरावती :** चाकूने दहशत पसरणारा आरोपीला गुन्हे शाखेने अटक केली आहे.

४/०३/२६ रोजी रात्री गुन्हे शाखेचे पथक पो स्टे फ्रेजरपुरा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना जुना बायपास रोड, राहुल नगर गेट समोर एक इसम अजहर खान जुरावर खान वय ३६ वर्ष रा.पठाण चौक, अमरावती हा हातात चाकू घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करीत असताना मिळून आल्याने त्याला त्याब्यात घेऊन त्याच्याकडून १ चाकू (किंमत अंदाजे १०००/-रु) जप्त करून पो स्टे फ्रेजरपुरा येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सहकलम १३५ मपोका प्रमाणे तसेच गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आरोग्य विभागाच्या क्रिकेट स्पर्धेत जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती संघ ठरला अजिंक्य

प्रतिनिधी ५ मार्च

**अमरावती :** महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'टेनिस बॉल क्रिकेट सामने-२०२६' (वर्ष ८ वे) मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती संघाने विजय मिळविला. अमरावती येथील छत्रीतलाव मैदानावर नुकतीच ही स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेत आरोग्य विभागातील जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर्स, अधिकारी व कर्मचारी यांच्या एकूण १२ संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचा अंतिम सामना जिल्हा सामान्य रुग्णालय,अमरावती आणि अचलपूर महिला व बाल रुग्णालय यांच्यात झाला. स्पर्धेत जिल्हा सामान्य रुग्णालयाचे राज डुलगज याने मालिकावीर आणि उत्कृष्ट फलंदाजाचा बहुमान पटकावला. सुशील ओसवाल यांना उत्कृष्ट गोलंदाज, तर अभिजीत निचत यांना उत्कृष्ट क्षेत्ररक्षकाचा पुरस्कार देण्यात आला. पहिल्या सेमी फायनलमध्ये डॉ. मनिष गोतमारे आणि दुसऱ्या सेमी फायनलमध्ये स्वप्निल उसरे सामनावीर ठरले.

पुरस्कार वितरण सोहळ्याला अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद निरवणे, डॉ. रणजीत राठोड, डॉ. विक्रांत कुळमेथे, अनंतराव पारसकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ. प्रमोद निरवणे यांनी खेळाडूंचे कौतुक करताना सांगितले की, आरोग्य सेवेतील ताणतणाव दूर करण्यासाठी मैदानी खेळ अत्यंत आवश्यक आहेत.या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. निलेश पाचबुद्धे, विशाल पवार आणि आयोजन समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. राठोड यांनी आभार प्रदर्शन करून स्पर्धेची सांगता केली.

## विभागीय आयुक्तालयात ९ मार्चला विभागीय लोकशाही दिन

प्रतिनिधी ५ मार्च

**अमरावती:** विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी (दि. ९ मार्च २०२६ रोजी) सकाळी ११ वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे.

विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. नागरिकांनी तक्रार अर्ज dcgamravati@gmail.com किंवा dcg_amravati@rediffmail.com या ई-मेलवर विहित नमुन्यात पाठविण्याचे आवाहन आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

## कृत्रिम वाळू युनिट स्थापन करणाऱ्यांसाठी संधी; ६ मार्चला विशेष मार्गदर्शन सभेचे आयोजन

प्रतिनिधी ५ मार्च

**अमरावती :** राज्यात बांधकाम क्षेत्रासाठी नैसर्गिक वाळूचा तुटवडा आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासनाने 'कृत्रिम वाळू' धोरण निश्चित केले आहे. या धोरणाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि नवीन युनिट स्थापन करू इच्छिणाऱ्या उद्योजकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी दिनांक ६ मार्च २०२६ रोजी महसूल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे दुपारी १२.३० वाजता जिल्हा खनिकर्म विभागामार्फत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

शासकीय धोरणानुसार, कृत्रिम वाळू युनिट स्थापन करण्यासाठी सध्या ऑफलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येत आहेत.

मात्र, हे युनिट स्थापन करण्याची कार्यपद्धती, अर्जाचा नमुना आणि तांत्रिक बाबींबाबत अनेक इच्छुकांच्या मनात शंका दूर करण्यासाठी या मार्गदर्शन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.जिल्हा खनिकर्म अधिकारी प्रणिता चापले यांनी सांगितले की, कृत्रिम वाळू निर्मितीला चालना देण्यासाठी शासन स्तरावर विविध सवलती आणि कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या बैठकीत युनिट स्थापन करण्याबाबतच्या अडचणींवर चर्चा केली जाईल तसेच नवीन अर्जाबाबत सविस्तर माहिती दिली जाईल. तरी ज्यांना कृत्रिम वाळू युनिट सुरू करण्यात रस आहे किंवा ज्यांच्या अर्जाबाबत काही शंका आहेत, अशा संबंधितांनी या बैठकीला उपस्थित राहावे, असे आवाहन खनिकर्म विभागाकडून करण्यात आले आहे.

## शहरातील भटक्या श्वानांचा बंदोबस्त करा !



प्रतिनिधी ५ मार्च

**दर्यापूर :** शहरात भटक्या श्वानांचा प्रमाण वाढलं असून त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. भटक्या श्वानांमुळे किरकोळ अपघातही वाढले आहे. अशा शहरातील भटक्या श्वानांचा तातडीने बंदोबस्त करावा. अशी मागणी भाजपचे नगरसेवक रोशन कट्यारम यांनी केली असून यासंदर्भात नगर परिषदेला निवेदन दिले आहे. बंदोबस्त न केल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे., शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये व शहराच्या मुख्या ठिकाणी भटक्या श्वानांचा हैदोस पसरला असुन शहरात लोकांना खुप त्रास सोसावा लागत आहे. तरी येत्या ८ दिवसात भटक्या श्वानांचा ताबडतोब बंदोबस्त करण्यात यावा ही विनंती. निवेदन देता वेळी भाजपचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

प्रो.नं. ६५०/२०२६
दिवाणी न्यायालय व. स्तर. दर्यापूर
दि. २८/०२/२०२६

**वि. २ रे सह दिवाणी न्यायालय (व. स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालयात**

(किरकोळ अर्ज क्र. ११२/२०२६) ने ता. ०८/०४/२०२६

**अर्जदार :**
**१. वर्षा गजेंद्र मावळे, वय अं. ५३ वर्ष, धंदा - नोकरी**
**२. ललित गजेंद्र मावळे, वय अं. ३१ वर्ष, धंदा - मजुरी**
**३. सुमित गजेंद्र मावळे, वय अं. २६ वर्ष, धंदा - मजुरी**
**सर्व रा. पंजाबराव कॉलनी बनोसा. ता. दर्यापूर जि. अमरावती**

**...विरूध्द...**

**गैरअर्जदार-**

**निरंक**

या जाहीर नोटीस द्वारे सर्वांना कळविण्यात येते की, गजेंद्र रामभाऊ मावळे हे दिनांक २१/०९/२०२० रोजी मरण पावले आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII) १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा, अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०२/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहा. अधीक्षक (प्रशासन)**
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर

सिटी न्यूज सुपरफास्ट **खामगाव**

# श्री सदगुरु एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतिने होळी उत्सव साजरा !

प्रतिनिधी ५ मार्च

**खामगाव :** वाईटावरील चांगल्याच्या विजयाची आठवण म्हणून होळी साजरी केली जाते असे कार्यक्रम प्रसंगी देविदास शर्मा यांनी सांगितले.




सतीफैल परिसरातील श्री सदगुरु एकनाथ महाराज भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली मागील २६ वर्षा पासुन विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविल्या जात आहे. ३ मार्च रोजी स्व. गोपाल ठाकूर यांच्या वाड्यात होळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते चंद्रग्रहण असल्यामुळे दुपारी ३ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत श्री शिवाय् नमस्तुभ्यमं १००८ वेळा सामुहीक जप. नामस्मरण करण्यात आले नंतर अबीर गुलाल एकमेकांना लावून होळी साजरी करण्यात आली या प्रसंगी मंडळाचे सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष देवीदास शर्मा, दिलीप झापर्डे, विनोद सुकाळे, अरूण कडवकर, लालाजी सांगळे, विनोद चिमणकर, सचिन ठाकूर, सागर ठाकूर, प्रमोद गायकवाड, दादा ठाकूर, विनोद ढवळे, विजय गायकवाड, आशा अंधारे, सुशिला आवलकर, पार्वती सुकाळे, शकुंतला ढवळे, संगीता वाघोळे, शोभा ठाकूर, प्रिती ठाकूर, स्वाती गायकवाड, शालिनी ठाकूर, डॉली ठाकूर, सरला गौर, दुर्गा ठाकूर, मानु शर्मा, नायरा ठाकूर, मनीषा पवार, शितल चिमणकर, कमल कोमुकर, आशा दिपके, वच्छला कुटे, कोकीळा जाधव व परिसरातील महिला पुरूषांची उपस्थिती होती.

### राजापेठ पोलीसांनी गुन्हातील आरोपी यांना घेतले ताब्यात

**अमरावती :** राजापेठ पोलिसांनी गुन्ह्यातील आरोपी ताब्यात घेतले आहे. ०३/०३/२०२६ रोजी फीर्यादी स्वप्नील प्रभाकर साव ३८ रा. यशोदा नगर चौक, अमरावती यांनी रीपोट दिला की ते दोन वाजता दरम्यान माधव लॉन येथे परीवारासह धुलीवंदन कार्यक्रमा करीतागेले असता. ४ वाजता दरम्यान ते गेट जवळ गेले असता तेथे काही मुले आपसात हातात दगड घेवुन मारत होते.काळ्या रंगाची टी शर्ट घातलेल्या एकाने चाकु काढल्याने फिर्यादी पळाले तर त्यांचा तोल जावुन ते घसरुन खाली पडले व त्यांचे उजव्या पायाला जखम झाली त्याला उपचारा करीता भरती केले. तसेच फिर्यादीने तिनही आरोपी विरुध्द तक्रार दाखल केली. तक्रार दिली वरुन पोलीस स्टेशनला अपक्र. १४१/२०२६ कलम १२५ (अ), ३५२(२), १३१भा.न्या. स. सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोद असुन तपासावर आहे.

स्व.संजयभाऊ ठाकरे पाटील
यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.!
जयंतीनिमित्त विविध समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन ६ मार्च २०२६
रूग्णांना फळवाटप
सकाळी ९.३० वा.
स्थळ:- जिल्हा सामान्य रुग्णालय खामगांव
लॉयन्स क्लब अन्नछत्र येथे
रूग्णांना भोजनदान
वेळ:- सकाळी १०.३० वाजता
स्थळ:- जिल्हा सामान्य रुग्णालय, खामगांव
पाणपोई उद्घाटन
सकाळी ११.०० वा
सकल मराठा सेवा संघ कार्यालयासमोर, जलंब नाका, खामगांव
स्व.संजयभाऊ ठाकरे पाटील
बळीराजा शेतकरी आत्मसन्मान योजना
आत्महत्याग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत
सकाळी ११.३० वा
स्थळ:- सकल मराठा सेवा संघ कार्यालय, खामगांव
अनाथ, अनवानी व्यक्तींना
स्लीपर चप्पल वाटप
वेळ: सकाळी १२.०० वा स्थळ:- रेल्वे स्टेशन , खामगांव
सकल मराठा सेवा संघ -:विनीत:- श्री छत्रपती प्रतिष्ठान खामगांव
स्व.संजयभाऊ ठाकरे पाटील चॅरिटेबल ट्रस्ट खामगांव जि.बुलढाणा



सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# बाळापुरच्या बाभुळखेड, काळबाई परिसरात मातीची चोरी, महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी ५ मार्च

**बाळापूर :** शहराला लागून असलेल्या काळबाई बाभुळखेड भागात व शहरातून काही गावांकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या बाजूला असलेल्या मातीच्या कपारी खोदून प्रचंड प्रमाणात मातीची चोरी होत आहे तसेच म्हैस नदीच्या पात्रातील जेसीबीच्या साहाय्याने वाळु सुध्दा चोरी जात असुन मात्र बाळापूर येथील महसूल प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून तर गाव स्तरावरील कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांचे या प्रकाराकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते आहे.याबाबत शेतकऱ्यांचा वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे.

बाळापूर शहरांतील बाभुळखेड काळबाई भागातील



रस्त्यांना लागून असलेल्या मातीच्या कपारी खोदण्यासाठी चक्क जेसीबीचा वापर केला जात आहे. तसेच म्हैस नदी पात्रातील वाळु सुध्दा जेसीबीने मातीच्या मोठमोठ्या कपारी खोदून ट्रॅक्टर व ट्रक द्वारे माती चोरून नेली जात आहे. ही माती व्यावसायिक उद्देशासाठी वापरली जात असून त्यासाठी बाळापूर प्रशासनाकडे कोणताही महसूल जमा केला जात नाही किंवा माती खोदून नेण्यासाठी संबंधितांकडून कोणतीही परवानगी काढली जात नाही. या प्रकाराने शासनाचे नुकसान तर होतच आहे शिवाय ही खोदलेली माती रस्त्यांवर अस्ताव्यस्त पसरल्याने दुचाकी चालकांना अपघातांचा सामना करावा लागत आहे. शिवाय माती वाहून नेणाऱ्या वाहनांमुळे ही अपघातांची शक्यता वाढलेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात शहराला लागून असलेल्या बाभुळखेड काळबाई परिसरातील अवैध माती अनेक गावांकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या लगत मातीची चोरी होत असताना देखील उपविभागीय अधिकारी तहसीलदार किंवा मंडळ , अधिकारी पटवारी यांना माहिती मिळाली नसेल असे होऊ शकत नाही. मात्र माहिती मिळाल्यानंतरही प्रशासनची टिम सुध्दा या ठिकाणी जाऊ शकत नाही. तरीही रोज अगदी राजरोसपणे मातीची चोरी होत असल्याने या प्रकारात महसूल प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी आणि माती चोरी करणारे यांच्यामध्ये साटे-लोटे असल्याची चर्चा होत आहे. तरी उपविभागीय अधिकारी यानी या प्रकरणात लक्ष घालावे अन्यथा शेतकऱ्यांचा वतीने अकोला येथील पालकमंत्री व जिल्हाधिकारी याना निवेदन देण्यात येणार आहे.

# शेगाव येथे राष्ट्रीय आरोग्य मेळाव्यात पातूर ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालयाची उल्लेखनीय कामगिरी




प्रतिनिधी ५ मार्च

**पातूर :** केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या आदेशाने व संस्थेचे अध्यक्ष आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वंदनाताई जगन्नाथ ढोणे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय, पातूर यांच्या वतीने पंचकर्म सेवा केंद्र उभारण्यात आले होते.

पंचकर्म विभाग प्रमुख डॉ. अरुण राठी यांनी हजारो रुग्णांची तपासणी, मार्गदर्शन व उपचार यामध्ये नेतृत्व केले. महाविद्यालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली १००० पेक्षा अधिक रुग्णांनी मोफत पंचकर्म उपचारांचा लाभ घेतला. नेत्र तपासणी शिबिरात ५०० पेक्षा अधिक नागरिकांची तपासणी करून गरजू रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ही सेवा लाभदायक ठरली. आरोग्य मेळाव्यात आयुर्वेद विद्यार्थी व आयुर्वेद चिकित्सकांसाठी विशेष प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. २६ रोजी प्रो. व क्रियाशारीर विभाग प्रमुख डॉ. अरुण राठी यांनी व्याख्यान दिले. देशातील विविध आयुर्वेद महाविद्यालयांचे शिक्षक, विद्यार्थी, आयुर्वेदिक वैद्य व खाजगी वैद्य यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. त्यांच्या वैज्ञानिक मांडणीला प्रचंड प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात डॉ. संजीव राठोड, डॉ. वर्षा देसाई, डॉ. अभिषेक मुळे, डॉ. चंद्रविजय भोयरे (पंचकर्म विभाग), डॉ. भुजबळे, डॉ. आश्विनी चौधरी, डॉ. अजय वरेकर, डॉ. अश्विनी दिंडोकार, डॉ. कल्याणी घाटे, डॉ. अभिनय मुळे अजमत खान, महाविद्यालयाचे संचालक डॉ. साजिद शेख व प्राचार्य डॉ. अभय भुस्कळे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण टीमने उत्कृष्ट समन्वय साधला. तसेच डॉ. काटोले, डॉ. विजय कवडे, धनंजय मिश्रा, शुभम राठोड, आशा सावरकर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला.

## बेरोजगार प्रकल्पग्रस्तांचे मुंबई आझाद मैदानावर आंदोलन

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोला :** राज्यात दोन कोटी ५० हजार प्रकल्पग्रस्तांची संख्या असून त्यामध्ये चार लाख पन्नास हजार बेरोजगार आहेत की ज्यांच्याकडे प्रमाणपत्र आहेत. अशा प्रकल्प असताना भरती प्रक्रियेत अत्यंत पाच टक्के आरक्षण असून ते १५ टक्के करण्यासाठी मुंबई आज आम्हाला उपोषण सुरू असून त्यामध्ये समाविष्ट होण्याकरता सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष संजय धनाडे यांनी राज्याचे सर्व प्रकल्पग्रस्तांना उपस्थित राहण्याकरता आव्हान केले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या १५३ च्या आश्वासनानंतर अजून पर्यंत प्रशासनाने कोणतीही उपायोजना ना केल्याने बेरोजगार प्रकल्पग्रस्तांचे ४५ वयोमर्या संपुष्टात येत असून पाच टक्के आरक्षण येऊन मोठी संख्या भरती प्रक्रिया शक्य नसल्याने पाच टक्के आरक्षण १५ टक्के करण्याचे मागणी सतत होत आहे. राज्यात सतत होत असलेल्या मेगा भरती मध्ये अनेक बेरोजगार प्रकल्पग्रस्त वंचित राहत असून प्रकल्पग्रस्त कुटुंबांचा पदर निर्वाचा साधन उपलब्ध होत नाही तरी सोमवार दिनांक ९ मार्च २०२६ आझाद मैदान मुंबई येथे जास्तीत जास्त संख्येने राज्यातील बेरोजगार प्रकल्पग्रस्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सुनिल गावंडे, संतोष राठोड विजय चव्हाण राज्याचे राजेश दुतोंडे, राठोड गुरुजी, पियुष देशमुख, आशिष सुर्वे, सर्व तालुक्यातील अध्यक्ष पदाधिकारी व प्रमाणपत्र धारक यांनी केले आहे.

# आठव्या वर्षी सय्यद रजाचा पहिला रोजा पूर्ण

प्रतिनिधी ५ मार्च

**आलेगाव :** पवित्र रमजान महिन्यात आलेगाव येथील मोमिनपुरा परिसरात राहणाऱ्या सय्यद अफजल यांचा मुलगा सय्यद रजा याने अवघ्या आठव्या वर्षी आपला पहिला रोजा यशस्वीरीत्या पूर्ण करून सर्वांसाठी प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे.



कडाक्याच्या उष्णतेत सुमारे १३ तासांचा रोजा पूर्ण करत सय्यद रजाने जिद्द, संयम आणि अढळ श्रद्धेचे दर्शन घडविले. सध्या वाढत्या उकाड्यामुळे मोठ्यांनाही त्रास सहन करावा लागत असताना या चिमुकल्याने उत्साह आणि समर्पणाने रोजा पाळल्याने परिसरात त्याचे विशेष कौतुक होत आहे. बरकत आणि इबादतीचा महिना म्हणून ओळखला जाणारा रमजान महिन्यात अल्लाहची कृपा मिळविण्यासाठी मुस्लिम बांधव प्रयत्नशील असतात. या पवित्र काळात लहान मुलेही श्रद्धा आणि उत्साहाने सहभागी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. दुसरीत शिक्षण घेणाऱ्या सय्यद रजाने लहान वयात पहिला रोजा पूर्ण करून कुटुंबाचा मान उंचावला आहे. त्याच्या या यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार तसेच समाजातील विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सय्यद रजाच्या या प्रयत्नातून इतर मुलांनाही प्रेरणा मिळत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# माळरानावरुन अनुभवला चंद्रग्रहणाचा आनंद

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोला :** या वर्षातील पहिल्या आणि शेवटच्या एकमेव ग्रहणाचा आनंद विश्वभारती केंद्र शिर्ला अंधारे शिवारात ग्रामीण व शहरी भागातील आबालवृद्धांनी दुर्बीणीतून अनुभवला. केंद्रातील प्रतिकृतींतून विविध भौगोलिक व खगोलीय संकल्पना केंद्र प्रमुख प्रभाकर दोड यांनी समजावू सांगितल्या.

वातावरणातील संधीप्रकाश कमी होत असतांनाच पूर्व क्षितिजावर ग्रहणावस्थेतच चंद्रोदय बघतांना सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. निसर्गातील हा सावल्यांचा खेळ दिर्घ कालावधीचा असतांना आपल्या भागात केवळ विस मिनिटांचा चंद्र आणि पृथ्वीच्या लपंडाव बघता आला.सध्या

विज्ञानाच्या कक्षा अधिक वेगानी वाढत असताना



जनमानसातील अंधश्रद्धेचे ग्रहण सुटायला हवे. चंद्रग्रहण आणि सोबतीला गुरु, शूक्र आणि शनी, ध्रुवतारा व उपस्थित ताऱ्यांच्या दर्शनाचा लाभ घेता आला.यामध्ये अजिंक्य फिटनेस पार्क अकोला येथील गृप, अकोला,पातूर आणि परिसरातील आकाश प्रेमींच्या उपस्थितीत जेष्ठ नागरिक संघाचे नारायणजी अंधारे आणि मंडळी, अजिंक्य समुहाचे प्रमुख धनंजय भगत, त्यांचा ग्रुप, देवीदास गुरुजी, अतुल अंधारे,खरडे जेलर,हरीश पाटील, गणेशराव लाहोळे, प्रा.अभिजीत दोड, डॉ.उमरकर, डिगांबर ढाळे,वर्षा व इशिता चिंचोळकर, माधुरी व गार्गी भगत, धनश्री, अद्विका, अनुराधा, कल्पेश, सान्निध्य ढोरे, आयुष,स्वराज, सानिका खापरकर,धिरज कातखेडे, अभिराज, विराज, युग आदी बालमंडळी सहभागी झाली होती. भूगोल आणि खगोल यावरील प्रश्नोत्तरानंतर आभार प्रदर्शन प्रभात किड्सची सोयरा अंधारेनी करून या उपक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटमध्ये संस्कृती आणि 'इको-फ्रेंडली' होळी



प्रतिनिधी ५ मार्च

**अकोला :** माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात सतत दोन वर्ष जिल्हा तसेच विभागात आपला ठसा उमटवणारी आलेगाव मधील प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट मध्ये होळीचा सण अत्यंत नाविन्यपूर्ण आणि सामाजिक जाणीव जपणाऱ्या उपक्रमांनी साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृतीचे जतन आणि पर्यावरणाचे रक्षण या दुहेरी उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

**राधा-कृष्ण पूजन आणि नैसर्गिक रंगांची उधळण**

कार्यक्रमाची सुरुवात राधा-कृष्ण यांच्या प्रतिकात्मक रूपाचे पूजन करून करण्यात आली. यावेळी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. 'पाणी वाचवा, निसर्ग वाचवा' हा संदेश देण्यासाठी शाळेत संपूर्णपणे पाणी विरहित खेळण्यात आली. विशेष म्हणजे, बाजारातील रासायनिक रंगांना फाटा देत विद्यार्थ्यांनी पळसाच्या फुलांपासून तयार केलेल्या नैसर्गिक रंगांचा वापर केला. यातून निसर्गस्नेही होळी साजरी करण्याचा मोलाचा संदेश समाजाला देण्यात आला.

**बंजारा नृत्य आणि पारंपरिक 'चाकोळ्या' कार्यशाळा**

महाराष्ट्रातील समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन घडवण्यासाठी विद्यार्थ्यांनी बंजारा संस्कृतीतील पारंपरिक होळी नृत्य सादर केले. तसेच, होलिका दहनासाठी झाडांची कत्तल न करता शेणापासून बनवलेल्या 'चकोळ्या' (गौऱ्या) वापरण्याची परंपरा पुनरुज्जीवित करण्यासाठी विशेष कार्यशाळा घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी उत्साहाने विविध आकारांच्या चकोळ्या तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले, ज्यामुळे लुप्त होत चाललेली ही परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यास मदत झाली.

**सशस्त्र सेना दिन निधी संकलन: एक सामाजिक कर्तव्य**

होळीच्या आनंदासोबतच देशाच्या रक्षणासाठी लढणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शाळेत 'सशस्त्र सेना ध्वज दिन' निधी संकलन उपक्रम राबविण्यात आला. शासनाच्या या मोहिमेत पालकांनाही सामावून घेण्यात आले. सैनिकांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या कुटुंबाला मदत करण्याच्या हेतूने हा निधी जमा करण्यात आला, ज्यातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना रुजवण्यात आली. हा संपूर्ण सोहळा पातूर पंचायत समिती चे गटशिक्षणाधिकारी प्रवीण डाबेराव आलेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री निवास चव्हाण विशेष साधनव्यक्ती श्री कटरे तसेच शाळेचे अध्यक्ष श्री. अक्षयजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक महावीर जैन यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सेंट पॉल्स अकॅडमी येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा



प्रतिनिधी ५ मार्च

**अकोट :** स्थानिक सेंट पॉल्स अकॅडमी अकोट येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष नवनीत लखोटिया होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष लुनकरण डागा ,सचिव प्रमोद चांडक, दीपम लखोटिया, तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, व्यवस्थापक प्रभुदास नाथे , पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, सारिका रेळे, मालती महल्ले, वैशाली गावत्रे व विज्ञान शिक्षक शुभम कळसकर ,जयश्री हिंगणकर यांची मंचावर उपस्थिती होती .

कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व सी. वी. रमण यांच्या प्रतिमांचे पूजनाने व दिप प्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुकेश कहार यांनी विज्ञान दिवासा निमित्य प्रास्ताविक भाषण दिले. व नंतर भाषणाला सुरुवात झाली. इ ५ ते ९ वी मधील विद्यार्थी स्वरा वनकर ,श्रेयश येवुल यांनी शास्त्रज्ञा विषयी माहिती सांगितली. तर उन्नती साबळे, सियारा पळसपगार ,मंदार थोरात, विराग उगले, शर्वरी हरणे, ईश्वरी साबळे यांनी विज्ञान दिना विषयी आपल्या भाषणातून माहिती सांगितली. इ ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा व इ ८ व ९ च्या विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान दिवस का ? साजरा करतात, यामागील कारण सांगून त्याचे महत्त्व आपल्या भाषणातून सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी विज्ञान दिप (ज्योत) पेटवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी पोटे यांनी केले तर आभार प्रदर्शन भाविका लोणकर यांनी केले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैभवी तायडे, दिप्ती अग्रवाल, मयुरी हुतके ,सोनल गांधी, सृष्टी देशमुख, शिल्पा ठाकूर, विनिता हाडोळे, प्रतीक्षा काळे, ज्ञानेश्वरी बोंद्रे, ऐश्वर्या चौधरकर, दीक्षिता चोपडे, अगस्ती ठाकूर, प्रणव देंडव तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सेंट पॉल पब्लिक स्कूल मध्ये वाईट विचारांचे दहन

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोट :** अकोट तांदुळवाडी फाटा स्थित सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये २ ला विद्यार्थ्यांनी वाईट विचाराचे दहन केले. या कार्यक्रमाला शाळेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, लुनकरण डागा, प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, शाळेचे प्रा. द्वारिका प्रसाद बसेर, डॉ. कविता मिश्रा, धनश्री कुलट व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे कुमकुम तिलक करून झाली मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून झाली. होलिका दहन करण्यात आले.

त्यानंतर वर्ग चौथीच्या विद्यार्थ्यांची श्रीकृष्ण लीला दाखवणारे नृत्य सादर केले.




नर्सरी ते नववीच्या च्या विद्यार्थ्यांनी रंगांचा खेळण्याचा आनंद घेतला.त्यानंतर शाळेच्या डॉ.कविता मिश्रा यांनी भक्त प्रल्हाद ची गोष्ट सांगितली. आपण होळी का साजरी करतो? हे सांगितले. भक्तीचे व चांगल्या विचारांचे महत्त्व आपल्या जीवनात खुप असते सांगुन सर्वांना होळीच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शाळेचे प्रा. द्वारिका प्रसाद बसेर यांनी होळीचा आनंद घेण्याचे व होळी खेळताना विशेष काळजी घेण्याची सूचना विद्यार्थ्यांना देऊन होळीच्या शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी निमकर व माधुरी टिकार यांनी तर आभार प्रदर्शन प्रिया वाडोकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या कार्यकर्त्यांनी ग्राहक हिताचा सन्मान करावा : ॲड.श्रीपाद कुलकर्णी

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोला :** अखिल भारतीय ग्राहक पंचायत अकोला च्या वतीने ग्राहकांची डिजिटल युगात ऑनलाईन ऑफलाइन फसवणूक होऊ नये, म्हणून १ मार्च रोजी भाऊसाहेब लहाने सभागृहात अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले. पहिल्या सत्रात अमरावती जिल्हा आयोग अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांनी ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्राहक पंचायत विदर्भ प्रांताध्यक्ष नारायणराव मेहरे होते. प्रमुख अतिथी माजी प्रांताध्यक्ष सुधाकरराव जकाते, जिल्हा सायबर प्रमुख ए.पी.आय मनीषा तायडे, कार्यकारी अभियंता डी.एम मानकर, कार्यकारी अभियंता श्रीकांत बनसोड, प्रांत सचिव



चारुदत्त चौधरी, प्रांत संघटक अभय खेडकर, प्रांत सदस्य विजय बाहाकर, जिल्हाध्यक्ष मनजीत देशमुख, महानगर अध्यक्ष दिनेश पांडे आदी मान्यवर उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात ए.पी.आय.मनीषा तायडे यांनी सायबर गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे ४० वर्षे वयाच्या स्त्री-पुरुषांनी सावध असावे. दैनंदिन व्यवहारात आपण काय करतो यावर अँड्रॉइड मोबाईलच्या आत मध्ये एक सुक्ष्म मायक्रोफोन असतो त्याव्दारे सर्व आकलन होते. मोबाईल वरून कॅशलेस व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी. पुरुषांनी स्त्रियांचे व्हिडिओ कॉल उचलू नये, त्या तुमची व्हिडिओ कॉल रेकॉर्ड करून फसवणूक करतात.त्या खरोखरच्या स्त्रिया नसून ै ने तयार केलेल्या स्त्रिया असतात. तिसऱ्या सत्रात महावितरण बाबत माजी कार्यकारी अभियंता डी. एम. मानकर व कार्यकारी अभियंता श्रीकांत बनसोड यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अभ्यास वर्गाच्या चौथ्या सत्रात नारायणराव मेहरे यांनी 'सैद्धांतिक अधिष्ठान'बाबत माहिती दिली. चारुदत्त चौधरी यांनी पर्यावरणाबाबत तसेच अभय खेळकर यांनी हसत खेळत विषय मांडला. ग्राहक पंचायतचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महानगराध्यक्ष दिनेश पांडे यांनी केले. संचालन विजय बाहाकर यांनी तर आभार प्रदर्शन जयंत भोकरे यांनी केले.

## CHANGE OF NAME

I MOHAMMAD JAMEEL AHMED R/O 3RD FLOOR, INAYATULLAH MANZIL, MOHD ALI ROAD, AKOLA MS INFORMING ALL THAT I HAVE CHANGED MY NAME FROM **MOHAMMAD JAMEEL AHMED** TO **NEW NAME MOHD JAMEEL AHMED MOHD INAYATULLA** NOW EVERYONE CAN KNOW AND CALL ME BY MY NEW NAME **MOHD JAMEEL AHMED MOHD INAYATULLA**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

गुरुवार, दि. ५ मार्च २०२६

https://epaper.citynewssuperfast.com

# पुसद येथील औद्योगिक विकाससाठी ७१.९१रु कोटीच्या प्रस्तावाला मान्यता

## उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्यामुळे यश

प्रतिनिधी ५ मार्च

**पुसद** : पुसद औद्योगिक क्षेत्रामधील पायाभूत सुविधा अद्यावत करण्याकरीता महाराष्ट्र ओद्योगीक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुमारे ७१.९१ कोटी रुपयाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. म.ओ.वि. महामंडळाने सन १९९२ साली सुमारे १७२.७३ हेक्टर जागेवर पुसद औद्योगिक क्षेत्र विकसीत 7 केले असून, त्यामध्ये एकूण २६८ भूखंड आरेखित केले आहे.



त्यापैकी २३८ भूखंड उद्योजकांना वितरीत करण्यात आले असून, त्यापैकी ६५ भूखंडावर उत्पादन सुरु आहे. मान्यता प्रदान करण्यात आलेल्या प्रशासकीय औद्योगिक प्रस्तावामध्ये मुख्यतः पुसद क्षेत्रामधील ४.७५ किमी लांबीचे ५.५ मी. रुंद व ४.०९ किमी लांबीचे ७.५ मी. रुंद सिमेंट रस्ते विकसीत करण्यात येणार आहे. याशिवाय रस्त्याच्या कडेने अद्यावत पथदिवे व आवश्यक ठिकाणी हायमास्ट बसविण्यात येणार आहे. तसेच उद्योजकांना सुरळीत पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने मार्शल जॅकवेल पासून पुसद औद्योगिक क्षेत्रातील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंतची ३५० मोमी व्यासाच्या पाईप लाईनचे बळकटीकरण, मार्शल जॅकवेल ॲप्रोच ब्रिजची दुरुस्ती, पंपींग मशिनरी बदलविणे, जॅकवेलसाठी सोलर सिस्टीम कार्यान्वित करणे, जलशुद्धीकरण केंद्र व फायर स्टेशन यांची दुरुस्ती व सुधारणा इत्यादी कामे म.ओ. वि. महामंडळाच्या वार्षिक महसुल आराखड्यातून करण्याचे प्रस्तावित आहे. राज्यमंत्री इंद्रनील नाईक, यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांचे आभार मानले.

# व्हिडीओ बनविण्यावरून प्राण गेला; मजुराची हत्या

प्रतिनिधी ५ मार्च

**यवतमाळ** : पुसद तालुक्यातील कारला रोडवरील चिंतामणी मंदिरासमोरील टेकडीवर सोमवारी (दि. ३ मार्च) रात्री घडलेल्या धक्कादायक घटनेत एका मजुराचा प्राण गेला. ४७ वर्षीय राजकुमार काशी साह यांचा मृत्यू व्हिडीओ काढण्यावरून सुरू झालेल्या वादाच्या दरम्यान झालेल्या मारहाणीत झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली असून स्थानिक नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

या टेकडीवर सध्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू आहे आणि बिहार व पश्चिम बंगालमधील मजूर कामासाठी येथे आले आहेत. रात्री साडेनऊच्या सुमारास बिहारमधील तीरबुलवा (ता. गुठणी, जि. शिवान) येथील रहिवासी राजकुमार काशी साह, त्यांचा भाऊ पारस आणि राजकेश्वर यांच्यात पैसे पाठविण्याच्या कारणावरून खोलीत वाद झाला. वादाचा व्हिडीओ काढण्यास पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बिक्की आमल अधिकारी (वय ३२) यांनी सुरुवात केली. हे लक्षात येताच पारस काशी साह यांनी संतापून बिक्की याला चापट मारला. त्यानंतर काही मजुरांमध्ये धक्काबुक्की सुरू झाली. आपल्या भावाला वाचविण्यासाठी राजकुमार पुढे आले. मात्र वाद अधिक चिघळत गेला आणि लाथाबुक्यांनी मारहाण सुरू राहिली. याच वेळी जवळ पडलेल्या लाकडी लाफ्टरने बिक्की यांनी राजकुमार यांच्या पाठीवर जोरदार प्रहार केला. या प्रहारात ते गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यूमुखी पडले. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह पुढील तपासणीसाठी पुसद येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. या प्रकरणी तीन जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असून तपास पोलिस उपनिरीक्षक कैलास ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# शासकीय रुग्णालयातील डायलिसिस सेंटरमध्ये सुविधा नाही

प्रतिनिधी ५ मार्च

**उमरखेड** : शहरातील राजाराम प्रभाजी उत्तरवार शासकीय उपजिल्हा रुग्णालयात पाच महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या डायलिसिस सेंटरमध्ये रुग्णांसोबत येणाऱ्या नातेवाईकांसाठी मूलभूत सुविधा नसल्यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

सामान्यतः एका रुग्णाला डायलिसिस पूर्ण होण्यासाठी तीन ते चार तास लागू शकतात. परंतु केंद्रातील वेटिंग रूममध्ये बसण्याची खुर्ची नसल्याने नातेवाईकांना बाहेर उभे राहावे लागते. तसेच पिण्याचे पाणी उपलब्ध नसणे आणि केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाणी साचलेले असणे, परिस्थिती अधिक कठीण बनवत आहे. या परिस्थितीमुळे विशेषतः वृद्ध रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक तासन तास उभे राहावे लागत आहेत, जे शरीरासाठी थकवा निर्माण करते. काही रुग्णांना डायलिसिस दरम्यान चक्कर येणे किंवा उलट्या होणे अशा संभाव्य दुष्परिणामांचा धोका देखील निर्माण होतो. स्थानिक नागरिकांनी रुग्णालय प्रशासनाकडे तातडीने या समस्येवर उपाय करण्याची मागणी केली आहे. नातेवाईकांचे म्हणणे आहे की, "जर बसण्याची सोय आणि पिण्याचे पाणी दिले गेले नाही, तर रुग्णांसाठी उपचार घेणे अत्यंत त्रासदायक ठरत आहे." यावेळी रुग्णालयाने डायलिसिस सेंटरमध्ये नातेवाईकांसाठी बसण्याची व्यवस्था, पिण्याचे पाणी व रस्त्यावरील पाण्याची समस्या त्वरित दूर करण्यासाठी योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे, अशी मागणी उपस्थित केली जात आहे.

# महादेव घरडे यांचा 'धम्म भुषण' पुरस्काराने सन्मान

## आंबेडकरी व फुले-शाहु चळवळीतील कार्याचा गौरव

प्रतिनिधी ५ मार्च

**यवतमाळ** : चिकणी डोमगा येथील आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते आणि धम्म प्रचारक महादेव बापूराव घरडे यांना महाबोधी बहुउद्देशीय संस्था वटफळीच्या वतीने आयोजित धम्मपरिषदेत 'धम्म भुषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भदंत नागघोष महाथेरो आणि डॉ. एच. आर. धम्मदिप महाथेरो यांच्या हस्ते तसेच आयोजन समितीच्या वतीने बौद्ध धम्म चळवळीतील योगदानाबद्दल घरडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सामाजिक समता परिषद नेरच्या वतीने त्यांना 'फुले-शाहु-आंबेडकरी कार्यकर्ता पुरस्कार'देखील प्रदान करण्यात आला. पालकमंत्री संजय राठोड, प्रा. जोंगेद्र कवाडे, डॉ. राजेंद्र गवई,



नागदेव खोब्रागडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. घरडे गेल्या तीन दशकांपासून ग्रामीण भागात धम्म प्रचार, प्रसार तसेच सामाजिक समता व अधिकारसंबंधी कार्य करीत आहेत.

घरडे यांना यापूर्वी भारत सरकारच्या वतीने जिल्हा युवा पुरस्कार, अकोला येथील सेवावी पुरस्कार, तसेच राज्यस्तरीय समाज प्रबोधन सिंधुरत्न पुरस्कार आणि पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीनबंधु पुरस्कार मिळाले आहेत. कार्यक्रमात सहभागी मान्यवरांनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांचे अभिनंदन केले. या पुरस्कारामुळे महादेव घरडे यांचे सामाजिक कार्य आणि धम्म प्रचारातील योगदान सार्वजनिक स्तरावर मान्यता प्राप्त झाले आहे, ज्यामुळे युवावर्गाला प्रेरणा मिळत आहे.

# विदर्भ हिंदकेसरी शंकरपट; 'शिव-सर्जा' आणि 'पिस्टल-मन्या' जोडीची दमदार बाजी

प्रतिनिधी ५ मार्च

**महागाव** : महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) येथे स्व. धोंडीरावजी कदम पाटील, स्व. दादाराव रंभाजी कदम आणि स्व. ब्रिजलाल जयस्वाल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ भव्य शंकरपट (बैलगाडा) शर्यतीचे आयोजन करण्यात आले. दि. २८ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत डॉ. राम कदम यांच्या शेतात ही स्पर्धा रंगली. तीन दिवस चाललेल्या या शंकरपटासाठी पंचक्रोशीतील हजारो प्रेक्षकांनी मोठ्या शिस्तीत उपस्थिती लावून स्पर्धेची शोभा वाढवली.

स्पर्धा 'अ' आणि 'क' अशा दोन गटांत पार पडली. महाराष्ट्रातील नामांकित बैलगाडा जोड्यांनी यात सहभाग घेतला. 'अ' गटात प्रमोद भगत लेवा यांच्या 'शिव-सर्जा' या जोडीने ५.८१ वेळ नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला आणि ७१ हजार रुपयांचे बक्षीस मिळवले. प्रवीण कैकाडे (चिंचोली) यांच्या 'चिक्या-देवा' जोडीने ५.८९



वेळेसह दुसरे स्थान मिळवले, तर साहेबराव पाटील (हिवरा) यांच्या 'कैलास-चंद्रा' जोडीने तिसरे स्थान पटकावले.

'क' गटात अतिसुर्मा (वाशिम) यांच्या 'पिस्टल-मन्या' जोडीने ५.९३ वेळ नोंदवत प्रथम क्रमांक मिळवला. बंडू चव्हाण (बावनगुडा) यांच्या 'शंकर-लखन' जोडीने दुसरे, तर मनीष मोहोड (माळेगाव) यांच्या 'सर्जा-टायगर' जोडीने तिसरे स्थान पटकावले. या स्पर्धेत एकूण चार लाख रुपयांची बक्षिसे देण्यात आली असून दोन्ही गटांमध्ये अन्य स्पर्धकांनाही प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार उपस्थित होते. यावेळी भाजपा यवतमाळ जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, दीपकराव आडे, संदीप ठाकरे, अरुण पाटील, बाळू पाटील, सुशील जामकर (माजी सरपंच), सतीश ठाकरे, चंद्रभान आंडगे, अमृतराव देशमुख, श्रीराम कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आई एकविरा देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आयोजक साहेबराव पाटील यांनी प्रास्ताविकातून शंकरपट खेळाला शासनाने राजाश्रय द्यावा, अशी मागणी केली. स्पर्धेतील उर्वरित रकमेतील आठ हजार रुपये हनुमान मंदिर बांधकामासाठी देण्यात आले, तसेच अंध कलाकार फाळके यांना हार्मोनियम भेट देण्यात आले. या शंकरपटाचे यशस्वी आयोजन साहेबराव पाटील मित्रमंडळाने केले. कार्यक्रमाचे संचालन राजू गिरी यांनी केले.

# पृथ्वी कामळेचे सीए परिक्षेत यश

प्रतिनिधी ५ मार्च

**यवतमाळ** : आठवडी बाजार परिसरातील युवती पृथ्वी नितीन कामळे हिने चार्टर्ड अकाउंटंट (सीए) ची परीक्षा उत्तीर्ण करत एक आदर्श निर्माण केला आहे. जीवनातील अडचणींवर मात करत, सातत्य, चिकाटी आणि आत्मविश्वास याच्या जोरावर तिने या कठीण परीक्षेत यश संपादन केले.

पृथ्वीचे यश फक्त शैक्षणिक नाही, तर प्रेरणादायक आहे. सीए तयारीदरम्यान तिच्या जीवनात मोठी आव्हाने आली. तिचे मातृछत्र हरवले, वडिलांना अर्धांगवायूचा झटका बसला आणि परिस्थिती बिकट झाली. तरीही, तिने हार मानली नाही आणि अभ्यासात सातत्य ठेवलं. पृथ्वीने सांगितले, "मी टार्गेट चार्ट तयार केला, दररोज १६



तास अभ्यास केला आणि पाच वर्ष सातत्याने मेहनत घेतली. यामुळेच मी सीएची परीक्षा उत्तीर्ण होऊ शकलो." तिच्या कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे आणि स्वतःच्या चिकाटीमुळेच हे यश शक्य झाले. पृथ्वीने विद्यार्थ्यांना संदेश दिला की, "सातत्याने आणि कठोर परिश्रमाने कोणतीही परिस्थिती पार करता येते." तिच्या यशाचे कौतुक शिक्षक, मित्रमंडळ आणि समाज करत आहेत, आणि ती इतरांसाठी प्रेरणास्त्रोत ठरत आहे.

# तेंडोळी शाळेत वृक्ष पूजनासह रंगोत्सव; मुलांनी साजरी केली पर्यावरणपूरक होळी

प्रतिनिधी ५ मार्च

**आर्णी** : पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा तेंडोळी येथे विद्यार्थ्यांनी वृक्ष पूजन करून होळी उत्सवाचा प्रारंभ केला. हा सण सामाजिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जातो. जुने भांडणे, गैरसमज, गरिबी किंवा श्रीमंती विसरून सर्वजण बंधुभावाने एकत्र येतात आणि आनंद व उत्सव साजरा करतात, अशी वैशिष्ट्यपूर्ण बाब या सणात दिसते.

विद्यार्थ्यांनी वाईट वृत्ती, अहंकार आणि नकारात्मक विचारांचे प्रतिकात्मक दहन करून सकारात्मक जीवनाची शपथ घेतली. मुख्याध्यापक गौतम मारुती घरडे यांनी मुलांना पर्यावरणपूरक पद्धतीने होळी साजरी करण्याचे मार्गदर्शन केले. त्यांनी



सांगितले की, होळीमध्ये लाकूड जाळण्याऐवजी गवत, केरकर किंवा गुरांच्या शेणाचा वापर करावा; प्लास्टिक किंवा रासायनिक रंग जाळणे टाळावे; पाण्याचा अपव्य टाळावा; आणि पोळी प्रतिकात्मक ठेवून गरजूंना दान करावे.

विद्यार्थ्यांनी उत्साहाने रंगपंचमी साजरी केली, बंजारा संस्कृतीचे परंपरागत "लेंगी" नृत्य सादर केले आणि गळ्यात साखरेच्या गाठी टाकून रंगोत्सवाची सांगता केली. शाळेतील शिक्षक, सरपंच सौ. सपना रवी राठोड, उपसरपंच श्री. भगवान निकुरे, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोविंद तराळे, उपाध्यक्ष मंगल पवार आणि गावकरी उपस्थित होते.

या उपक्रमामुळे निसर्ग संवर्धन, सामाजिक बांधिलकी आणि परंपरेच्या जतनाचा संदेश देणारा रंगोत्सव गावात आदर्श ठरला आहे. शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे हा उत्सव सामाजिक व शैक्षणिक दृष्टिकोनातून महत्वाचा ठरला असून गावातील प्रतिष्ठित व्यक्तीकडून या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले आहे.

# पोलीस शिपाई भरती; पात्र उमेदवारांची यादी जाहीर

प्रतिनिधी ५ मार्च

**यवतमाळ** : पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या कार्यालयात १५० पोलीस शिपाई पदांसाठी भरती प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदर भरतीसाठी उमेदवारांनी अर्ज केले असून, मैदानी चाचणी ११ फेब्रुवारी २०२६ ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या संपन्न झाली आहे.

पोलीस शिपाई पदासाठी अर्ज केलेल्या व मैदानी चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची यादी १:१० या प्रमाणात तयार करण्यात आली आहे. ही यादी अधिकृत संकेतस्थळावर www.mahapolice.gov.in तसेच ई-मेल sp.yavatmal@mahapolice.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच पोलीस कवायत मैदान, पळसवाडी कॅम्प, दारव्हा रोड, यवतमाळ येथे नोटीस बोर्डावर देखील ती उपलब्ध आहे. सदर यादीबाबत कोणतीही हरकती किंवा आक्षेप असल्यास उमेदवारांनी ५ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता पर्यंत लेखी स्वरुपात पोलीस नियंत्रण कक्ष, यवतमाळ किंवा ई-मेल sp.yavatmal@mahapolice.gov.in वर सविस्तर कारणासहित नोंद करावे. मोबाईलद्वारे प्राप्त तक्रारी स्वीकारल्या जाणार नाहीत. आक्षेप नोंदविण्याच्या कालावधीनंतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत. लेखी परीक्षा दिनांक, वेळ व परीक्षा केंद्राची माहिती उमेदवारांना महा-आयटीकडून मेसेज आणि ई-मेलद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर येताना आधार कार्ड व महा-आयटीकडून मिळालेले ओळखपत्र बरोबर आणणे आवश्यक आहे. पोलीस अधीक्षक, यवतमाळ, कुमार चिता यांनी उमेदवारांना वेळोवेळी अपडेट तपासण्याचे तसेच सर्व नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# एपस्टीन फाईल प्रकरणी वंचितचा जाहीर निषेध

प्रतिनिधी ५ मार्च

**यवतमाळ** : एपस्टीन फाईल प्रकरणाने संपूर्ण जगभर हाहाकार माजला असताना देशातील विरोधी पक्ष व इतर राजकीय पक्ष मूग गिळून गप्प बसलेले आहे. भारताचे प्रमुख बडे राजकारणी आणि त्यांचे अनेक सहकारी मंत्री व बडे उद्योगपती यांची नावे या प्रकरणांमध्ये जाहीर झाली असून या संबंधाने जाब विचारण्याचे धाडस कोणी करताना दिसत नाही. अशा अवस्थेमध्ये वंचित बहुजन आघाडीने एफस्टिन फाईल प्रकरणाचा तडा लावण्यासाठी जाहीर एल्गार पुकारलेला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकरांनी



2 मार्चला मुंबई येथे एप्सटीन फाईल प्रकरणी जाहीर एल्गार पुकारला असून विरोधी पक्षाने मौन पाळल्याबद्दल जाब विचारला आहे. वंचित बहुजन आघाडीने संपूर्ण भारतीयांना या गंभीर प्रश्नाबाबत अवगत केले असून वंचित बहुजन आघाडीच्या यवतमाळ जिल्हा कार्यकारिणीने जाहीर निषेध नोंदवला असून संपूर्ण कार्यकर्त्यांनी तोंडाला काळ्या पट्ट्या लावून याचा निषेध नोंदवलेला आहे. याप्रसंगी डॉ.नीरज वाघमारे जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, उपाध्यक्ष- विशाल पोले, जिल्हा महासचिव- एड. संजय इंगळे, जिल्हा महासचिव- अशोककुमार कयापाक साहेब, शैलेश भानवे, आनंद भगत, उपाध्यक्ष -विशाल पोले, प्रमोद पाटील शहर कार्याध्यक्ष, गजानन कोकाटे, यादवराव नगराळे, दीपक वीर, थावरुजी वैद्य, भीमराव शिरसाट, संतोष मसराम, नितेश पाटील, सचिन मोहोड, चंद्रकांत वाळके, उत्तम कांबळे, अरविंद दिवे, दीपक वीर, केशव भागवत, रामदास वीर, मीराताई वीर, करुणा मून, संध्या काळे, भारतीताई सावते, सविता तिडके, सुजाता नगराळे, मालाताई पाटील, अंतरा अंबादे, लता भरणे, ईंदू सांगळे, विशाखा नगराळे, पूनम अंबादे, सुशीला गजभिये, विजया लोखंडे, माया मस्के, रेखा गजभिये, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'सर्जिकल बँक'ची स्थापना; गरजू रुग्णांना मिळणार मोफत वैद्यकीय उपकरणांची सोय

प्रतिनिधी ५ मार्च

**उमरखेड** : उमरखेडमधील समाजसेवक आणि भाजप नेते नितीनभाऊ भुतडा यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एक सामाजिक उपक्रम राबवला गेला. त्यांच्या नावावर "नितीन भुतडा सर्जिकल बँक" सुरु करण्यात आली असून, या बँकेच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मोफत वॉकर, व्हीलचेअर, स्ट्रेचर, स्टिक आणि इतर वैद्यकीय उपकरणे पुरवली जाणार आहेत.

उमरखेड शहराचे सरचिटणीस शेवंतराव गायकवाड यांनी या सर्जिकल बँकेची संकल्पना मांडली. रुग्णांना उपकरणांचा वापर संपल्यावर



ते स्वच्छ करून बँकेत परत करणे आवश्यक राहणार आहे, जेणेकरून ती दुसऱ्या गरजू रुग्णांसाठी वेळेत उपलब्ध होऊ शकतील. या उपक्रमामुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, फाउंडेशनच्या स्वयंसेवक टीमद्वारे गावागावात जाऊन गरजू रुग्णांची माहिती गोळा करून त्यांना उपकरणे पुरवली जातील. नागरिकही आपले उपकरणे दान देऊन किंवा स्वयंसेवक म्हणून सहभाग घेऊ शकतात.

शेवंतराव गायकवाड यांच्या मते, या अभिनव उपक्रमामुळे नितीन भुतडांनी आतापर्यंत केलेल्या सामाजिक कामाला नवा वेग मिळेल. "सर्जिकल बँकेमुळे अनेक गरजू रुग्णांना आरोग्यविषयक अडचणी दूर करण्यास मदत होईल आणि समाजात सेवा व सहकार्याचा संदेश पसरवला जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले. एन बी फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे उमरखेड परिसरात गरजू लोकांसाठी वैद्यकीय मदत सुलभ होईल, तसेच सामाजिक बांधिलकी वाढविण्यास हातभार लागणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि. ५ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## नगर पालिका अधिकारी व ठेकेदारानो...

# प्रक्रिया न करता कचरा खा हो, जाळुन प्रदुषणाने मारू नका हो !

## परिसरातील नागरिकांचा आर्त टाहो





● अतिष देशमुख @ वाशीम ●

वाशीम शहरातील अकोला नाका परिसरातील टेम्पल गार्डनमधील तारांगणाला भ्रष्टाचार झाकण्यासाठी आग लावून जाळण्यात आले . तर डम्पींग ग्राऊंडवरील कचऱ्यावर कधीच प्रक्रिया झाली नाही. त्यामुळे भ्रष्ट अधिकारी कचरा दररोज आग लावून प्रदुषण करीत आहेत. या धुरामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. भ्रष्टाचारासाठी आगीच्या खेळीमुळे नागरिकांचे प्रदुषनामुळे बळी जात आहेत.त्यामुळे नगर पालिक अधिकारी व ठेकेदारांनो प्रक्रिया न करता कचरा खायचा तर खा हो मात्र जाळुन प्रदुषणाने मारू नका हो असा आर्त टाहो डम्पिंग ग्राऊंड परिसरातील नागरिक करीत आहेत.

वाशीम नगर पालिकेच्या डम्पींग ग्राऊंडवरील कचऱ्यावर १० ते १२ वर्षात प्रक्रिया न झाल्याने कचऱ्याचे डोंगरा ऐवढे ढिगच्या ढिग साचले होते. दै. 'सिटी न्युज सुपरफास्ट'ने कचऱ्यावर प्रक्रिया न करता कोट्यवधी रूपयाचा कचरा खाल्याचे वृत्त मालिका पुराव्यासह प्रसिध्द करून या कचऱ्यातील कोट्यवधीच्या भ्रष्टाचाराला वाचा फोडली होती. हे प्रकरण भ्रष्टाचार रूपी रावणाच्या आंगलट येण्याची शक्यता वाढली असल्याने या भ्रष्टाचार रूपी रावणाने दसऱ्याच्या दिवशीच डम्पींग ग्राऊंडवरील डोंगरा एवढ्या कचऱ्यांच्या ढिगारांना आग लावून भ्रष्टाचार लपविण्याचा प्रयत्न केला होता. कारण कचऱ्यावर प्रक्रिया न झाल्याने अनेक वर्षापासून डम्पींग ग्राऊंडवर कचरा साचत होता. हे सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्त मालिकेमुळे सिध्द झाले.त्यामुळे भ्रष्टाचार रूपी रावणांनी डम्पींग ग्राऊंडवरील कचऱ्याला आग लावली. या कचऱ्यात अनेकांचे हात काळे झाले असून जाळले की, जळले हे कळले नसले तरी . पुन्हा २४ डिसेंबर २०२३ रोजी सलग दुसऱ्यांदा या डम्पिंग ग्राउंड वरील कचऱ्याला आग लागल्याने ही आग लागली नसून या झालेला भ्रष्टाचार लपवण्यासाठी ही आग लावल्याचे सिद्ध झाले आहे. या आगीचा धूर दोन दिवसापासून निघत असून भ्रष्टाचार भरपूर झाल्याचे सिध्द होत आहे. शिवाय धूरामुळे परिसरात प्रदुषण पसरले आहे. आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. भ्रष्टाचाराचा अन् कचरा खाण्याचा कळस म्हणजे कधीही मिशनद्वारे प्रक्रिया न केलेल्या ड्रोनद्वारे जिपीएसचे शुटींग न काढलेल्या भ्रष्ट ठेकेदार उत्तराधिकारी याने पुन्हा १ जानेवारी पासून प्रक्रिया करण्याऐवजी कचरा जाळण्याचे काम सुरू केले आहे. याला न.प. अधिकाऱ्यांची साथ आहे.

### आगीचे व्हिडीओ दररोज सोशल मिडीयावर व्हायरल

डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्यावर प्रक्रिया न करता कचरा खाण्यासाठी दररोज आग लावल्या जात आहे. याचे व्हिडीओ सामाजिक कार्यकर्ते अखील तेलीसह परिसरातील नागरिक दररोजच व्हायरल करीत आहे. तरीही निद्रावस्थेत असलेल्या भ्रष्ट नगर पालिका प्रशासनाला जाग येत नाही. त्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी भ्रष्ट ठेकेदारांना व अधिकाऱ्यांना कचरा खाण्याचा सल्ला दिला. मात्र, जाळुन प्रदुषण करून जीव मारू नका असे आवाहन केले आहे. सिटी न्युज सुपरफास्टने ही प्रक्रिया न करता खाल्ला कचरा या संदर्भात ३४ वृत्तांची वृत्त मालिका लावून भ्रष्टाचार केल्याचे सिध्द केले आहे.






### नागरिक विविध आजाराने त्रस्त, अधिकारी भ्रष्टाचार करून मस्त

डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्यावर प्रक्रिया न करता करोडो रूपये खाण्यासाठी कचरा दररोज आग लावून जाळण्यात येतो, या भयानक आगीमुळे परिसरात प्रदुषणाचा केमीकल युक्त काळा धूर पसरत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून त्यांना विविध स्वशनाच्या आजाराने त्रस्त झाले आहेत. अनेक वृध्दांना दमाच्या आजाराने ग्रासले आहेत. दररोज काळा धूर निघत असल्याने नागरिकांना श्वास घेण्यासही त्रास होत आहे. प्रदुषणामुळे अनेकांचे बळी जात आहे. कोट्यवधीचा कचरा खाण्याच्या भ्रष्ट खेळीने नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे नागरिकांचे जीवन वाचविण्यासाठी तरी जिल्हाधिकारी यांनी व प्रदुषण अधिकारी यांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करून चौकशी करण्याची मागणी होती आहे.

### कचऱ्यावर कधीच नाही केली प्रक्रिया भ्रष्टाचाराची निरंतर क्रिया

१. ओला व सुका कचरा संकलीत करून मोजमाप करणे.
२. डम्पिंगवर प्लॉस्टीक कचरा अलग करून प्रक्रिया करणे.
३. ओल्या व सुक्या कचऱ्यापासून कम्पोस्ट खत तयार करणे.
४. ही सर्व प्रक्रिया जिओ टॅगींगच्या ड्रोनशुटींगमध्ये करणे.
५. तयार खताच्या बॅगा नागरिकांना व शेतकऱ्यांना मोफत देणे.
६. निरउपयोगी प्लॉस्टीक सिमेंट कारखान्याला देणे.
७.मोठ्या मिशनद्वारे प्रक्रिया करून दररोजचा लेखाजोखा देणे.
८.कचऱ्यापासून किती आरडीएफ निघाले याची नोंद घेणे.
९.आगीपासून प्रदुषण होवू न देणे, याची काळजी घेणे.

### वाशीम, कारंजा, मंगरूळपीर, रिसोडची मॅनेज निविदा भ्रष्टाचाराची सुविधा...

कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी कोठयावधी रुपयाचा निधी येतो. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत २.० च्या धर्तीवर महाराष्ट्रातील १५१ नगर पालिकांना लाखो कोटीचा निधी देण्यात आला असून वाशीम जिल्हयातील कारंजा, मंगरूळपीर, रिसोड, यासाठीही चार कोटी रुपयाचा निधी पुन्हा मंजूर झाला आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या ठेक्यासाठी निविदा ऑनलाइन निविदा काढण्यात आल्या. ह्या निविदा मध्येही कचरा खाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. याच्या तक्रारीही जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्या. जणाचे नाहीतर मनाचेही भान राखण्यासाठी भ्रष्ट अधिकाऱ्यांनीही कचरा सोडून दुसरे इतर काही खावे जणे करून त्यांच्या तब्येतीसाठी तरी चांगले राहील. त्यामुळे कचऱ्याच्या सर्व निविदा रद्द करून नियमानुसार कचऱ्यावर प्रक्रिया करावी.







## जळाले डम्पिंग ग्राऊंड अन् तारांगण, वाचवा नाट्यगृहाचे आंगण...



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

कलावंतांच्या कलागुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने हक्काचे व्यासपीठ असावे, म्हणून कलावंतांना गेल्या कित्येक दशकांपासून मागणी करावी लागली. त्यानंतर नगर परिषदेने नवीन नाट्यगृह उभारले. मात्र, हे नवीन नाट्यगृह अद्यापही सुरू करण्यात आले नाही. त्यातच मंगळवारी दि. २६ सप्टेंबर २०२३ करोडो रुपये खर्चुन बांधलेली तारांगणाची वास्तू भर पावसात जळून खाक केली. हे वास्तव डोळ्यासमोर ठेवून तथा आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्यापूर्वी वाशिम नगर परिषदेने नवीन बांधलेले नाट्यगृह जाळण्यापूर्वी तातडीने सुरू करण्याची मागणी होत आहे. तसेच तारांगणाला व डम्पिंग ग्राऊंडला दररोज लागलेल्या आगीची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.कलावंतांच्या कला-गुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने नाट्यगृह असणे खूप गरजेचे आहे. याबाबत गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू असलेल्या मागणीमुळे वाशिम नगर परिषदेने नवीन नाट्यगृह उभारले. मात्र, हे नाट्यगृह अद्यापही सुरू करण्यात आलेले नाही. त्यामुळे हे नाट्यगृह केवळ एकप्रकारे शोभेची वास्तू म्हणून उभे आहे. त्यातच मंगळवारी (दि. २६ सप्टेंबर) सकाळी नगर परिषदेने करोडो रुपये खर्चुन बांधलेल्या तारांगणाला भर पावसात आग लागून भस्मसात झाले. त्यामुळे ही वास्तू जनतेच्या सेवेत येण्यापूर्वीच जळून खाक झाली. ही घटना डोळ्यासमोर ठेवून, वाशिम नगर परिषदेने लाखो रुपये खर्चुन उभारलेल्या नाट्यगृह तरी तातडीने सुरू करावे. अन्यथा या नवीन नाट्यगृहाच्या इमारतीला देखील आग लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही स्थिती पाहता नगर परिषदेच्या तारांगणाला लागलेल्या आगीची सखोल चौकशी करण्यात यावी, आणि नवीन नाट्यगृहाचे तातडीने लोकार्पण करण्यात यावे, अशी मागणी 'आप'चे राम पाटील डोरले यांनी केली आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# बार्शीटाकळी गावात पाण्यासाठी हाहा:कार

आजम खान ५ मार्च





**बार्शीटाकळी :** ठिकाण असूनही गावात पाणी समस्या कायम आहे. पाणी प्रश्न नगर पंचायत निवडणुकीच्या काळात उग्र झाला होता. राजकीय नेत्यांनी समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले परंतु अद्याप समस्या कायम आहे. लोकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. वॉल्व वरून पाणी भरण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

बार्शीटाकळी शहरात महान पाईपलाईन वरून पाणी चोरी होत होती त्यामुळे १ मार्च रोजी अकोला महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी कडक बंदोबस्तात कासम नाना चौक ते खोलेश्वर मंदिर पर्यंत अवैध पाईपलाईन कापली. तेथे आता नवीन समस्या निर्माण झाली आहे. हजारो लिटर पाणी वाहून जात आहे. याला जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित झाला आहे. एकीकडे लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकावे लागत आहे. आणि त्याचवेळी पाण्याचा

## नगर पंचायत प्रशासनाची कायम डोळेझाक

अपव्यय मोठ्या प्रमाणात सुरू आहे. बार्शीटाकळी येथे टाकण्यात आलेल्या पाईपलाईनला कोणीही वारसदार नाही. पाण्याची टाकी अर्धवट झाली असून तिथे नगरपंचायत कार्यालय मधील कोणताही चौकीदार नाही. त्यामुळे लोक येथील लोखंड कापून विकत आहे. नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी कुंभकर्णी झोपेत आहेत. सध्या पवित्र रमजान महिना असून पाण्याकरिता लोक भटकत आहेत. शासन व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी बार्शीटाकळी येते पिण्याच्या पाण्याची सोय करून द्यावी अशी नागरिकांची मागणी आहे.

# विषारी पाणी पिल्यामुळे 51 बकऱ्यांचा मृत्यू

प्रतिनिधी ५ मार्च



**अकोट :** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव फाटा जवळ पांढरी मासमापुर येथे ४ मार्चला सकाळी एका शेतात असलेल्या तळ्यातील पाणी पिल्याने ५१ बकऱ्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. शेतमालका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पांढरी मासमापुर येथील मासुम महिला बचत गटाच्या महिला बर्कय़ांना चारण्यासाठी शिंगमोडी नदीकाठी गेल्या होत्या. बर्कय़ांना पाणी पाजण्यासाठी महिलांनी शेतकरी श्रीकांत रुचके यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी तात्पुरात्या तयार केलेल्या तळ्यातील पाणी पाजण्यास सांगितले. त्यानंतर बकऱ्यांनी पाणी पिल्यानंतर काही वेळातच एकामागून एक बर्कय़ा जमिनीवर कोसळायला लागल्या. बर्कय़ांना काय होते हे कळायच्या आधीच बर्कय़ा मरायला लागल्या. घडलेल्या घटनेची माहिती पोलिसांना दिली.

### पांढरी मासमापूर येथील घटना

या घटनेत शमशाद बी मोहम्मद रियाज, शहनाजबी वाईद खा, जयबून बी सालीमुद्दीन, हुस्नाबी शेख हमीद, शमाबी ईस्राईल खा, शबानाबी सलमान खा, शकिलाबी सय्यद रियाजूदिन व सलामाबी शेख इरफान यांच्या ५१ बकऱ्या दगावल्याने महिलांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. या महिला 'मासूम महिला बचत गट, मासमपूर पांढरी' यांच्या सदस्य असून त्यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया कडून सुमारे ६ लाख रुपयांचे घेतले होते. बकऱ्यांच्या पालनपोषणावर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून होता. महिलांनी शेत मालकावर गुन्हा दाखल करुन नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

घटनेचे गांभीर्य ओळखून ठाणेदार सुरज बोंडे यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. वैद्यकीय पथकाला पाचारण केले. बर्कय़ांचा पंचनामा झाल्यानंतरच बर्कय़ांचा मृत्यू नेमका कशाने झाले हे स्पष्ट होईल.मात्र ज्या महिलांनी आपल्या उदर्नीर्वाहासाठि बँकेचे कर्ज काढून बर्कय़ा विकत घेतल्या त्यांच्यासाठी ही फार मोठी घटना आहे. झालेल्या घटने संदर्भात शेतकरी श्रीकांत पाटील रुचके यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संपत्तीच्या वादातून भावाची हत्या

प्रतिनिधी ५ मार्च

## ♦ आरोपीला दोन तासात केली अटक




**अकोला :** अकोट फाईल मधील बापू नगरात संपत्तीच्या वादातून आरोपी रितिक अनिल बिहूने याने त्याचा चुलत भाऊ विनित विजय बिहूने याची हत्या केल्याची घटना ४ मार्च रोजी रात्री उशिरा घडली. अकोट फाईल पोलिसांनी आरोपीला अवघ्या दोन तासात अटक केली.

या घटनेमुळे बापू नगर परिसरात सुरक्षा वाढवली होती.. या प्रकरणी अकोट फैल पो लिस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीवरून रात्री उशि गुन्हा दाखल करण्याची पक्रिया सुरू होती. शोध मोहिमेत आरोपीला उशिरा रात्री अटक करण्यात आली. फॉरेंसिक तज्ञ घटनास्थळी दाखल झाले होते. प्राथमिक तपासात असे दिसून आले की, दोन्ही भावातील वादाचे मूळ कारण मालमत्ता आणि वारसाहक्काशी संबंधित आहे. पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, आरोपी हल्ला करण्यापूर्वी आणि नंतर घटनास्थळ सोडून पळून गेला होता. त्यामुळे पोलिसांच्या टीमने परिसरात सीसीटीव्ही फुटेज आणि शेजारील लोकांची माहिती गोळा केली. तज्ज्ञांच्या माहितीनुसार, फॉरेन्सिक तपासानंतर पुढील तपशील उघडकीस येऊ शकतात. पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, आरोपीस अटक झाली असून प्रकरणाची न्यायालयीन कारवाई तत्काळ सुरू होईल. या हत्याकांडाचा तपास पोलिस निरीक्षक रहिम शेख करत आहेत. वरिष्ठ पोलिस अधिकारी रात्री घटनास्थळी दाखल झाले होते.

# वन्यप्राण्यांच्या हैदोसामुळे कुटासा शिवारातील पिके नष्ट

प्रतिनिधी ५ मार्च

## ♦ पिके वाचवण्यासाठी शेतकरी कासावीस



**कुटासा :** शेत शिवारात एकेकाळी गहू, हरभरा, करडई, मूग, सोयाबीन व ज्वारी यांसारखी विविध पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जात होती. मात्र, गेल्या १० वर्षांत वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे ही सर्व पिके हळूहळू शिवारातून अदृश्य झाली आहेत. परिणामी येथील शेतकऱ्यांसमोर कपाशी हेच एकमेव पीक उरले आहे.

रानडुक्कर, नीलगाय व इतर प्राण्यांच्या हल्ल्यामुळे अन्नधान्य व कडधान्य पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊ लागले. संरक्षणासाठी कुंपण, पहारा व इतर उपाय खर्चिक ठरत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी ही पिके घेणेच बंद केले. कपाशी तुलनेने कमी नुकसानकारक ठरत असली तरी वाढती महागाई, बियाणे, खत, औषध फवारणी व मजुरीचा खर्च यामुळे खर्च वजा जाता मिळणारे उत्पन्न अत्यल्प होत आहे. या परिस्थितीमुळे कुटासा परिसरातील शेतकरी दिवसेंदिवस आर्थिक अडचणीत सापडत असून हतबल झाले आहेत. वन्यप्राण्यांचा त्रास सुरू राहिला तर भविष्यात शेती करणेही कठीण होईल, अशी भीती अनेक शेतकरी व्यक्त करत आहेत. वन्यप्राणी नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना, नुकसानभरपाईची प्रभावी अंमलबजावणी आणि शेतकऱ्यांना संरक्षण साधनांसाठी आर्थिक मदत देणे अत्यंत गरजेचे असल्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# बारा तासांत बेपत्ता तरुणीचा शोध

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोला :** खदान पोलिस स्टेशनला दाखल झालेल्या बेपत्ता तरुणीचा बारा तासात शोध लावून तिला तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आले. ३ मार्च रोजी फिर्यादी मेधा सतीश गायकवाड ४५, रा. शास्त्री नगर सिंधी कॅम्प यांनी खदान पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

त्यांची भाची फाल्गुनी उर्फ स्नेहा संतोष इंगोले २१, रा. वसंत नगर, मानोरा, जि. वाशिम ही आठ दिवस राहण्यासाठी त्यांच्या घरी आली होती. दोन-तीन दिवस मामाकडे राहिल्यानंतर ३ मार्च रोजी ती कारंजा येथे मावशीकडे जात असल्याचे सांगून घरातून निघून गेली; मात्र ती कारंजा येथे पोहोचली नाही. अकोला रेल्वे स्थानक परिसरात तिचा मोबाईल आढळून आल्याने ती बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली. तक्रारीवरून मिसिंग गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनात विशेष पथकाने तातडीने शोध मोहीम सुरू केली.

तपासा दरम्यान संबंधित तरुणीचे कारंजा येथील एका युवकासोबत लग्न ठरल्याची माहिती मिळाली. मोबाईल क्रमांकाच्या एसडीआर, सीडीआर तपासातून ती गजानन ज्ञानेश्वर शिंदे रा. वसंत नगर, मानोरा, जि. वाशिम याच्यासोबत शेगाव, जि. बुलढाणा येथे गेल्याचे निष्पन्न झाले. पोलिस पथकाने शेगाव येथे शोध घेतला असता तरुणी मंदिर परिसरात आढळून आली. चौकशीत ती दर्शनासाठी आल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तिला खदान पोलिस स्टेशनला आणून तिची आई सुंगामी संतोष इंगोले यांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अतिरिक्त पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# रुईखेड शेत शिवारातून दोन झटका मशीन चोरी

## ♦ शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची व चोराचा शोध घेण्याची मागणी

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोट :** रुईखेड परिसरातील शेत शिवारात बागायती पिकांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात तालुक्यातील ओलीत व केळी पिकासाठी अग्रेसर असलेले हे रुईखेड गाव मानले जाते या पिकाचे वन्य प्राण्या पासून बचाव करण्यासाठी लावण्यात आलेल्या दोन झटका मशीन चोरी गेल्याच्या घटना घडल्या आहेत. रुईखेड परिसरातील शेत जमीन ही बागायती असून सद्या शेती मध्ये केळी, भुईमूग, गहू, संत्रा, ज्वारी, मका ही पिके उभी असून वन्य प्राण्या कडून पिकाची होणारी नासाडी टाळण्यासाठी बागायतदार शेतकरी यांनी शेतामध्ये झटका मशीन लावल्या आहेत. पिकांच्या बचावा साठी हजारो रुपये खर्चून लावण्यात आलेल्या झटका मशीन अज्ञात चोरांनी चोरून नेल्याच्या दोन घटना नुकत्याच रुईखेड येथे घडल्या आहेत. गेल्या गजानन भाकर सुनील ठाकरे अशा इतरही शेतकऱ्यांच्या शेतातून झटका मशीन सह गावातील घराजवळून गुरेढोरे चोरून नेण्याचे सत्र हे चालूच आहे यावर कोणतेच प्रशासन आळा घालण्यासाठी सज्ज नसून दिसत आहे, अशी शेतकरी वर्ग ओरल घालीत आहेत, रुईखेड येथील शेतकरी प्रसाद अशोक झापे आणी अनिल पवार यांच्या शेतातून दोन झटका मशीन चोरी करण्यात आल्या आहेत. त्या मुळे रुईखेड परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून झटका मशीन चोरी करणाऱ्या अज्ञात चोरांना तात्काळ पोलीस प्रशासनाने शोध लावून यांना अटक करण्यात यावी. दि.४ ला रिपोर्ट दाखल केला माझे एकूण १० ते १५ हजाराचे नुकसान झाले. नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी अनिल पवार तसेच नुकसानग्रस्त प्रसाद झापे यांनी केली.

# जागतिक महिला दिनानिमित्त उद्या वॉकेथॉन

प्रतिनिधी ५ मार्च

**अकोला :** जागतिक महिला दिनानिमित्त महिला व बालविकासविभागातर्फे ६ मार्च रोजी 'वॉकेथॉन'चे आयोजन करण्यात आले आहे. उपक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते दु. ३ वा. जिल्हा परिषद येथे होईल. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम व पोलिस अधीक्षक अर्चित चांडक तसेच अनेक मान्यवर उपस्थित राहतील. अशोक वाटिका, हुतात्मा स्मारक, नेहरू पार्क असा मार्ग असेल. हुतात्मा स्मारक येथे हुतात्म्यांनापुष्पहार अर्पण करून वॉकेथॉन रॅलीचा समारोप होईल. अधिकाधिक महिला व पुरूषांनी या वॉकेथॉनमध्येसहभागी होण्याचे आवाहन जिल्हा कार्यक्रम अधिकारी राजश्री कौलखेडे व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले आहे.

# खंडेलवाल ज्वेलर्स प्रा. लि.च्या सेवेची आता मराठवाड्यात भरारी

## ♦ शंभर वर्षांची परंपरा – सहाव्या पिढीचे पारंपरिक आधुनिक नेतृत्व

प्रतिनिधी ५ मार्च



**अकोला :** विदर्भातील सुवर्णविश्वात विश्वास, शुद्धता आणि प्रामाणिक व्यवहार यांची परंपरा जपणारे खंडेलवाल ज्वेलर्स प्रा लि.अकोला गत शंभर वर्षापासून ग्राहकांच्या सेवेत कार्यरत असून संस्थेची सहावी पिढी आता आधुनिक दृष्टिकोन आणि जागतिक दर्जाच्या सुविधांसह व्यवसायाचे नेतृत्व करीत आहे.जुनी परंपरा व आधुनिकता यांचा योग्य संगम साधत खंडेलवाल ज्वेलर्स विदर्भातील सर्व जिल्ह्यांपर्यंत पोहोचण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. अकोल्यातील दोन सुसज्ज शोरूमनंतर वाशिम, बुलढाणा, वरूड,जि. अमरावती येथे संस्थेने विस्तार केला आहे. आता विदर्भाबाहेर मराठवाड्यात ही संस्थेने आपली भरारी घेतली असून जालना येथे खंडेलवाल ज्वेलर्सच्या नव्या अध्यायाची सुरुवात होत असल्याची माहिती खंडेलवाल ज्वेलर्स प्रा ली चे संचालक नितीन खंडेलवाल यांनी दिली. गुरुवारी गांधी रोडवरील केजी ३ मध्ये संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत संस्थेच्या एकंदर सेवेची माहीती देण्यात आली.

### आधुनिक सुविधा आणि जागतिक दर्जा

खंडेलवाल ज्वेलर्स प्रा. लि मध्ये ग्राहकांच्या सोयीसाठी प्रशस्त पार्किंग, स्वच्छ व सुसज्ज वॉशरूम सुविधा, कॅरेटोमीटरद्वारे शुद्धतेची खात्री, एचयुआयडी तपासण्यासाठी मायक्रोस्कोप, आय-ग्लास, व्यावसायिक ग्राहक समुपदेशन आणि सोन्याच्या दरातील चढ-उताराबाबत पारदर्शक मार्गदर्शन उपलब्ध असून जगभरातील पारंपरिक तसेच आधुनिक डिझाईन्स ग्राहकांच्या पसंतीनुसार कस्टमाईज करून देण्याची संपूर्ण सुविधा येथे उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले.

### सक्षम नेतृत्व व प्रशिक्षित कर्मचारीवर्ग

संस्थेत सहाव्या पिढीतील प्रतीक, रिशिका, हर्षल आणि शौर्य यांच्या नेतृत्वाखाली अनुभवी व प्रशिक्षित कर्मचारी व्यवस्थापन कार्यरत आहे. सर्व कर्मचारी सरकारी नियमांनुसार पूर्णतः कंप्लायंट असून पीएफ व ईएसआयसी अंतर्गत संरक्षित आहेत.

### सामाजिक बांधिलकी

खंडेलवाल ज्वेलर्स केवळ व्यवसायापुरते मर्यादित नसून सामाजिक जबाबदारीही जपत आहे.यात कर्मचारी वर्गाच्या मुलांना आयुष्यभर शिक्षण सहाय्य, शालेय बॅग, गणवेश, पुस्तके व शाळेची फी यांसारख्या सुविधा दिल्या जातात.

### विश्वास, शुद्धता आणि नैतिकता

तीन पिढ्यांपुढे व्यवसाय टिकवणे ही मोठी कामगिरी मानली जाते; परंतु खंडेलवाल ज्वेलर्सने सहा पिढ्यांची परंपरा यशस्वीरित्या जपली आहे. शुद्धतेची हमी, प्रामाणिक व्यवहार, पारदर्शक किंमत रचना आणि ग्राहकांच्या विश्वासाला सर्वोच्च प्राधान्य हीच संस्थेची ओळख आहे. 'गोल्ड ऑफ प्रोस्परिटी' म्हणून ओळखले जाणारे खंडेलवाल ज्वेलर्स हे शुद्धता, परंपरा आणि आधुनिकतेचा संगम आहे.सहाव्या पिढीच्या नेतृत्वाखाली खंडेलवाल ज्वेलर्स आगामी काळातही ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरून सुवर्णविश्वात आपला ठसा अधिक दृढ करण्यासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास नितीन खंडेलवाल यांनी यावेळी व्यक्त केला.

### सोन्याच्या दराबाबत विशेष हमी योजना

सोन्याचे दर भविष्यात किती वाढतील किंवा कमी होतील याबाबत अनेक तर्क-वितर्क केले जातात. काहीजण तर दर तीन लाखांपर्यंत जाऊ शकतात, अशीही शक्यता व्यक्त करतात.


मात्र ग्राहकांनी कोणतीही भीती बाळगण्याची गरज नाही. खंडेलवाल ज्वेलर्स आपल्या ग्राहकांसाठी विशेष दर-हमी योजना घेऊन आले आहेत. ३१ मार्चपर्यंत सोन्याचा दर बुक केल्यास, ३१ डिसेंबरपर्यंत दर कितीही वाढले तरी ग्राहकांना बुक केलेल्या दरातच सोने मिळेल. आणि जर दर कमी झाले, तर कमी झालेल्या दराचा लाभही ग्राहकांनाच दिला जाईल.

म्हणजेच दर वाढले तरी सुरक्षित, दर कमी झाले तरी फायदेशीर! 'चितही आपली आणि पटही आपली' अशा प्रकारची पूर्ण सुरक्षित व पारदर्शक योजना ग्राहकांच्या हितासाठी उपलब्ध असून याचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# ऐन रमजान महिन्यात सुका-मेव्याच्या किमती वाढल्या !

प्रतिनिधी ५ मार्च

## ♦ इराण-इस्त्रायल युद्धाचा परिणाम, आणखी भाववाढ होण्याची शक्यता



**अकोला :** इराण-इस्त्रायल युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी उलथापालथ होत आहे. त्याचे पडसाद आता अकोल्यातही उमटू लागले आहेत. सध्या मुस्लीम बांधवांचा रोजा सुरू असून, आगामी काळात ईद साजरी करण्यात येणार आहे. याच दरम्यान युद्ध सुरू झाल्यामुळे याचा थेट परिणाम सुका-मेव्याच्या किमतीवर पडला आहे. सध्या हे दर किलोमागे ५० ते १०० रूपयांनी वाढले असून, आगामी काळात ते आणखी महागण्याची शक्यता सुक्या मेव्याच्या ठोक व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

अकोल्यामध्ये मोठ्या प्रमाणात खजूर, पिस्ता, बदाम, अक्रोड यांसारखे ड्रायफ्रुट्स आखाती देशांतून आयात केले जातात. युद्धजन्य परिस्थितीमुळे समुद्री वाहतूक, विमा खर्च आणि आयात प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत. परिणामी ड्रायफ्रुट्सच्या दरात किलोगामे ५० ते १०० रूपयांपर्यंत वाढ झाली आहे. विशेषत: रमजान आणि आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर खजूर आणि पिस्त्याला मोठी मागणी असते. मात्र सध्या मालाची आवक घटल्याने किरकोळ विक्रेत्यांना वाढीव दराने माल खरेदी करावा लागत आहे. काही व्यापाऱ्यांनी साठेबाजीची शक्यता देखील नाकारलेली नाही. शहरातील किरकोळ ग्राहकांनाही याचा फटका बसत असून, सणासुदीच्या खरेदीवर परिणाम दिसून येत आहे. व्यापाऱ्यांच्या मते, जर मध्यपूर्वेतील तणाव दीर्घकाळ कायम राहिला तर दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. मात्र परिस्थिती लवकर सुरळीत झाल्यास बाजार पुन्हा स्थिर होऊ शकतो. एकूणच, आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडींचा थेट परिणाम स्थानिक बाजारावर होत असल्याचे यातून स्पष्ट झाले आहे.

### आताचा नेमका दर काय?

| ♦वस्तू | गत महिन्यातील दर | आताचे दर |
|---|---|---|
| खजूर | ३५० रु. | ४५० रु. |
| पिस्ता | १८०० ते २००० रु. | २००० ते २२५० |
| मामरा बदाम | ३००० ते ३२०० रु. | ३५०० ते ४००० |
| शहाजीरा | ८०० रु. | १२०० रु. |

♦गत आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात सुका-मेव्याच्या किमतीत किलोमागे जवळपास ५० ते १०० रूपयांची वाढ झाली असून, परिस्थितीत अशीच राहिली तर पुढील आठवड्यात हे भाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.

**गिरीश मंत्री**, धान्य व्यापारी, अकोला

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK